# योहानाने लिहिलेले येशु ख्रिस्ताचे शुभवर्तमान
# योहाननी लिखेल येशु ख्रिस्तनं शुभवर्तमान
## वळख

योहाननी लिखेल हाई शुभवर्तमान नविन करारमातील चार शुभवर्तमानसपैकी एक शे, जे येशु ख्रिस्तना जिवननं वर्णन करस. मत्तय, मार्क, लूक अनी योहान ह्यासनाद्वारा ह्या पुस्तके येशु ख्रिस्तना मृत्युनंतर लिखात, ह्या पुस्तकसले “शुभवर्तमान” अस म्हणतस, ख्रिस्तना जन्मनंतर ९० वरीसना जवळपास हाई शुभवर्तमान येशुना शिष्य योहान ह्यानी लिख व्हतं. पुस्तकमा असं लिखेल नही की, योहान लेखक शे. तरी हाई पुस्तकनी लेखननी पध्दत १ ला, २ रा, ३ रा योहान ह्या पत्रसनामायकच शेतस. काही प्राचीन लेखकसले वाटस की योहान इफिस शहरमा र्‍हाये म्हणीसन हाई पुस्तक त्यानी इफिस शहरमा लिखं व्हई.

योहान स्पष्टपणतीन सांगस की, हाई पुस्तकना हेतु लोकसले येशु ख्रिस्त जिवत देवना पोर्‍या योहान २०:३१ असं ईश्वास कराले मदत करस. यावर ईश्वास ठेवावर आपण त्याना नावमा जिवन जगु शकतस. हाई पुस्तक यहूदी अनी गैरयहूदी वाचनाराकरता लिखाई जायेल शे. योहानना शुभवर्तमानमा बाकीना तीन शुभवर्तमानसपेक्षा काही येगळा गोष्टी शेतस. येशुनी करेल चमत्कारवर त्यानी ध्यान केंद्रीत करेल शे अनी त्यानी दृष्टांताबद्‌ल बराच काही लिखी ठेवात नही. येशुना बाप्तिस्मा अनी अरण्यमाधली परिक्षा यासना सारख्या बाकिन्या महत्वाना घटना हाई शुभवर्तमानमा लिखेल नहीत.

रूपरेषा

१ योहान शुभवर्तमाननी सुरवात. १:१-१८

२. नंतर तो त्या काही चमत्कारबद्‌ल लिखस ज्या येशुनी करात. १:१९—१२:५०

३. नंतर तो येशुना जिवनना बराच काही घटनासना वर्णन करस जे त्याले मरण अनी पुनरूत्थाननाजोडे लई जास. १३:१—२०:३१

४. नंतर योहान शुभवर्तमान संपवस. ज्यानामा एक येळ येशु मरेलमाईन ऊठीसन लोकसना समोर वना. अनी पुस्तक लिखाना आपला उद्देशबद्दल लिखस. २१

जिवनना शब्द

1 सुरवातले शब्द व्हता; शब्द देवसंगे व्हता अनी शब्द देव व्हता.
2 तोच शब्द सुरवातपाईनच देवनासंगे व्हता.
3 सर्वकाही त्यानी शब्दघाई बनाडं; जे सर्वकाही बनी गयं त्यामा कोणतीच वस्तु
अशी नही जी त्यानाशिवाय बननी व्हई.
4 शब्दमा जिवन व्हतं अनी ते जिवन मनुष्यले प्रकाश व्हतं.
5 तो प्रकाश अंधारामा चमकस, तरी अंधारना प्रभाव त्यानावर पडना नही.
6 ✡देवनी धाडेल एक संदेशवाहक प्रकट व्हयना त्यानं नाव व्हतं योहान.
7 तो प्रकाशबद्दल साक्ष देवाकरता वना; यानाकरता की त्यानाद्वारा सर्वासनी
त्याना संदेश ऐकीसन ईश्वास कराले पाहिजे.
8 तो स्वतः प्रकाश नव्हता; तर तो त्या प्रकाशबद्दल साक्ष देवाकरता येल व्हता.
9 जो खरा प्रकाश प्रत्येक माणुसले प्रकाशमय करस तो जगमा येणार व्हता.
10 तो शब्द जगमा व्हता, अनी देवनी त्यानाद्वारा जगले अस्तित्वमा आणं, तरी
जगनी त्याले वळखं नही.
11 तो आपला स्वतःना लोकसकडे वना, तरी त्याना स्वतःना लोकसनी त्याना
स्विकार करा नही.
12 परंतु जितलासनी त्याना स्विकार करा, म्हणीसन तितलासले म्हणजे त्याना
नाववर ईश्वास ठेयेल शे, त्यासले त्यानी देवना पोऱ्या व्हवाना अधिकार दिधा.
13 तो रक्तघाई नही, शरिरना ईच्छाघाई नही, अनी मनुष्यना ईच्छाघाई नही,
पण परमेश्वरना ईच्छातीन उत्पन्न व्हयेल शे.
14 शब्दनी शरीर धारण करं, कृपा अनी सत्य याघाई परीपुर्ण राहिनसुध्दा तो
आमनामा जिवन जगना, आम्हीन त्यानं गौरव दखं ते गौरव देवबापकडतीन येल
एकुलता एक पोऱ्यानं ऱ्हास अस व्हतं.
15 योहान त्यानाबद्दल साक्ष देस अनी उच्चा आवाजमा म्हणस, “जो मना
मांगतीन ई राहीना, ‘तो मनापेक्षा महान शे, कारण तो मना जन्मना पहिले व्हता.’ ”
16 देवना कृपेना परीपुर्णता मातीन आपला सर्वासले, आशिर्वादघाई भरी दिधं.
17 देवनी नियमशास्त्र हाई मोशेना द्वारा देयल व्हतं, पण कृपा अनी सत्य हाई येशु
ख्रिस्तनाद्वारा येल शे.
18 देवले कधीच कोणी दखेल नही, जो एकुलता एक पोऱ्या, जो देवबाप मायक
शे, अनी जो त्यानाजोडे बठेल शे, त्याच पोऱ्याद्वारे देवनी स्वतःले प्रकट करं.

✡ **1:6** १:६ मत्तय ३:१; मार्क १:४; लूक ३:१,२

## बाप्तिस्मा करनारा योहानना संदेश
*(मत्तय ३:१-१२; मार्क १:१-८; लूक ३:१-१८)*

19 योहाननी साक्ष हाई शे की, जवय यहूदी अधिकारीसनी यरूशलेम शहरमातीन
याजकसले अनं लेवी* लोकेसले योहानले ईचाराले धाडं की, "तु कोण शे?"
20 योहाननी उत्तर देवाकरता नकार दिधा नही, पण उघडपणतीन अनी
स्पष्टपनतीन मान्य करं की, "मी ख्रिस्त नही शे"
21 तवय त्यासनी त्याले ईचारं, "तर मंग तु कोण शे? तु एलिया शे का?"
योहान बोलना, "नही, तु संदेष्टा शे का?" आखो त्यासनी ईचारं. त्यावर त्यानी
उत्तर दिधं, "नही."
22 "मंग त्या त्याले बोलणात, आमले सांग मंग तु कोण शे, ज्यासनी आमले
धाडेल शे त्यासले सांगाकरता आमले उत्तर दे. तु स्वतःबद्दल काय म्हणस?"
23 तो बोलणा यशया संदेष्टानी सांगेल प्रमाणे;
"मी जंगलमा एक घोषणा करनारानी वाणी शे;
प्रभुना मार्ग नीट करा!"
24 ह्या संदेशवाहकसले परूशीसनी धाडेल व्हतं,
25 मंग त्यासनी† त्याले ईचारं, "जर तु ख्रिस्त नही शे, जर तु एलिया नही शे
अनं संदेष्टा बी नही शे, मंग बाप्तिस्मा का बर देस?"
26 योहाननी उत्तर दिधं, "मी तर पाणीघाई बाप्तिस्मा देस, पण तुमनामा एकजण
असा उभा शे की, ज्याले तुम्हीन वळखतस नही.
27 हाऊ तोच शे जो मना नंतर येणार शे, त्याना पायमधला जोडानी दोरी सोडानी
पण मनी लायकी नही."
28 ह्या गोष्टी यार्देन नदीना पलीकडे बेथानीमा जठे योहान बाप्तिस्मा दि राहिंता
तठे घडण्यात.

## देवना कोकरा

29 दुसरा दिन योहाननी दखं की येशु त्यानाकडे ई राहिना, अनं बोलना, "हाऊ
दखा, जगना पाप उचली लेणारा, देवना कोकरा!"
30 हाऊच तो शे ज्यानाबद्दल मी सांगेल व्हतं, "मना नंतर एकजण ई राहिना,
पण तो मनापेक्षा श्रेष्ठ शे, कारण मना जन्मना पहिले तो अस्तित्वमा व्हता."

---
* **1:19** १:१९ लेवी याजकसले मदत करनारा † **1:25** १:२५ त्यासनी संदेशवाहकसनी

31 मी त्याले वळखेल नव्हतं, पण मी याकरता पाणीघाई बाप्तिस्मा देत वनु की
त्यानी इस्राएलवर प्रकट व्हवाले पाहिजे.
32 योहाननी अशी साक्ष दिधी की; “मी आत्माले स्वर्गमाईन कबुतरना मायक
उतरतांना दखं अनी तो त्यानावर थांबना हाई दखेल शे.
33 अजुन पर्यंत मी त्याले वळखेल नव्हतं तो एक व्हता, पण त्या देवनी, ज्यानी
माले पाणीघाई बाप्तिस्मा कराले धाडेल शे, त्यानी माले सांगेल व्हतं, ‘तु ज्या
माणुसवर आत्मा उतरतांना अनं त्यानावर थांबेल दखशी; तोच पवित्र आत्माघाई
बाप्तिस्मा करनारा शे.’
34 योहान बोलणा, मी दखेल शे,” अनं “मी तुमले साक्ष देस, हाऊ देवना पोऱ्या
शे.”

## येशुना पहिला शिष्य

35 दुसरा दिन योहान त्याना दोन शिष्यससंगे उभा व्हता,
36 जवय योहान येशुले जातांना दखीन बोलना, “दखा, हाऊ देवना कोकरा!”
37 दोन शिष्य त्यानं हाई बोलनं ऐकीसन येशुना मांगे निंघी गयात.
38 येशुने वळीन त्यासले मांगे येतांना दखं, अनं त्यासले ईचारं, “तुम्हीन काय
शोधी राहिनात?” त्या बोलणात, रब्बी, म्हणजे “गुरजी तुम्हीन कोठे ऱ्हातस?”
39 येशु त्यासले बोलना, “चला अनं दखा.” कारण जवळपास संध्याकायना
चार वाजेल व्हतात. मंग त्यासनी त्यानासंगे जाईन दखं तो कोठे ऱ्हास, अनी त्या
दिन त्यानासंगेच राहिनात.
40 योहानना बोलणं ऐकीन त्यानामांगे त्या दोनजण गयात त्यासनामातीन एक
अंद्रिया, जो शिमोन पेत्रना भाऊ हाऊ व्हता.
41 त्याले त्याना स्वतःना भाऊ शिमोन पहिले भेटना, तवय तो त्याले बोलना,
“आमले मसीहा,” म्हणजे “ख्रिस्त” सापडना.
42 मंग तो त्याले येशुजोडे लई गया.
येशु त्याले दखीन बोलना, तु योहानना पोऱ्या शिमोन शे, पण तुले केफा म्हणजे
पेत्र म्हणतीन त्याना अर्थ म्हणजे “खडक”

## येशु फिलीप्प अनं नथनेलले बलावस

43 पुढला दिन येशुनी गालीलमा जावाना निर्णय लिधा. तवय फिलीप्प त्याले
भेटना; येशुनी त्याले सांगं, “मनामांगे ये!”
44 फिलीप्प हाऊ अंद्रिया अनं पेत्रना गावना म्हणजे बेथसैदाना व्हता.

45 फिलीप्पले नथनेल भेटावर तो त्याले बोलना, “ज्यानाबद्दल मोशेनी
नियमशास्त्रमा लिखेल शे अनं संदेष्टानी बी त्यानाबद्दल लिखेल शे. तो म्हणजे
योसेफना पोऱ्या, नासरेथ गावना येशु, आमले सापडेल शे.”
46 नथनेल त्याले बोलना, “नासरेथमातीन काही चांगलं निंघु शकस का?”
फिलीप्प बोलना, “चल अनं दख”
47 येशु नथनेलले आपलाकडे येतांना दखीन, त्यानाबद्दल बोलना, “हाऊ खरा
इस्त्राएली शे, यानामा कपट नही!”
48 नथनेल त्याले बोलना, “तु माले कसं काय वळखस?” येशुनी उत्तर दिधं
फिलीप्पनी तुले बलावाना पहिले, “तु अंजिरना झाडखाल उभा व्हता तवय मी तुले
दखं.”
49 नथनेल बोलना, “गुरजी, तुम्हीन देवना पोऱ्या शेतस! तुम्हीन इस्त्राएलना
राजा शेतस!”
50 येशु बोलना, “मी तुले सांगं की, मी तुले अंजिरना झाडखाल उभं राहेल दखं
म्हणीन तु ईश्वास धरस का? तु यानापेक्षा बी मोठ्या गोष्टी दखशीन!”
51 आखो तो त्यासले बोलना, “मी तुमले खरंखरं सांगस, की, तुम्हीन स्वर्गले
उघडेल अनी देवना स्वर्गदूतसले चढतांना अनं मनुष्यना पोऱ्यावर म्हणजे मनावर
उतरतांना दखशात.”

# 2

## काना गावमाधलं लगीन

1 तीसरा दिन गालील शहरमाधला काना गाव आठे एक लगीन व्हतं, तठे येशुनी
माय व्हती,
2 येशु अनी त्याना शिष्यसले बी लगीननं आमंत्रण व्हतं.
3 जवय द्राक्षरस संपना तवय येशुनी माय त्याले बोलनी, “त्यासनाजोडे द्राक्षरस
नही शे.”
4 येशु तिले बोलना, “बाई ह्यानाशी तुना मना काय संबंध? मनी येळ अजुन
वनी नही.”
5 येशुनी माय नोकरसले बोलनी, “हाऊ जे सांगी ते करा.”
6 तठे यहूदीसना शुध्दीकरणना* रितप्रमाणे पाणीना सव दगडी मडका ठेयेल
व्हतात, त्यासमा शंभर लिटर पाणी माई इतल्या मोठल्या त्या व्हत्यात.
7 येशु नोकरसले बोलना, मडकामा पाणी भरा, तवय त्या त्यासनी पुर्ण भऱ्यात,

* **2:6** २:६ हात धवानी प्रथा

8 तवय त्यानी त्यासले सांगं, “आते त्यामातीन काढीन लिसन भोजन
कारभारीकडे लई जा.” तवय त्या लई गयात
9 द्राक्षरस बनेल पाणी भोजन कारभारीनी जवय चाखं, पण तो द्राक्षरस कुठला शे
हाई त्याले माहित नव्हतं, पण पाणी काढणारा नोकरसले माहित व्हतं, तवय भोजन
कारभारीनी नवरदेवले बलावं.
10 अनी त्याले बोलना, “प्रत्येकजण पहिले चांगला द्राक्षरस देस, अनी जवय
पाहुणा पिसन तृप्त व्हतस तवय बाशी देतस. पण तुम्हीन तर चांगला द्राक्षरस अजुन
पावत ठेयल शे.”
11 येशुनी आपला चिन्हसनी हाई सुरवात गालीलमाधला काना आठे करीसन
आपलं गौरव प्रकट करं, ते दखीसन त्याना शिष्यसनी त्यानावर ईश्वास धरा.
12 ✡त्यानंतर येशु, त्यानी माय, त्याना भाऊ अनं त्याना शिष्य कफर्णहुम गावले
गयात अनी काही दिन तठे राहीनात.

### येशु मंदिरमा जास
*(मत्तय २१:१२,१३; मार्क ११:१५-१७; लूक १९:४५,४६)*

13 तवय यहूदी लोकसना वल्हांडण सण जोडे वना, अनं येशु यरूशलेमले गया.
14 अनी मंदिरमा गुरढोरं, मेंढरं, अनं कबुतरं ईकनारा अनी पैसा अदल बदल
करनारा ह्या बठेल त्याले दखायनात.
15 तवय येशुनी दोरीसना एक चाबुक बनाडीन मेंढरं अनी गुरढोरं या सर्वासले
मंदिरमातीन हाकली दिधं; त्यानी पैसा अदल बदल करनारासना सर्व शिक्का फेकी
दिधात अनं त्यासना चौरंग पालथा करी दिधात.
16 अनी कबुतरं ईकनारासले सांगं, “हाई आठेन काढा, मना बापना घरले
व्यापारीसनं घर करू नका.”
17 तवय “तुना मंदिरमाधली मनी जिद्द माले आगनामायक जाळी टाकी”✡ अस
शास्त्रमा लिखेल शे हाई त्याना शिष्यसले आठवणं.
18 यहूदी अधिकारीसनी त्याले सांगं, “तुम्हीन हाई करतस तर आमले काय
चमत्कार दखाडतस तुमले त्याना अधिकार शे का?”
19 ✡येशुनी त्यासले उत्तर दिधं, “तुम्हीन हाई मंदिर मोडा, अनी मी ह्याले तिन
दिनमा परत उभं करसु.”

---

✡ **2:12** २:१२ मत्तय ४:१३ ✡ **2:17** २:१७ “तुना मंदिरमाधली मनी जिद्द माले आगनामायक जाळी टाकी” स्तोत्रसंहिता ६९:९ ✡ **2:19** २:१९ मत्तय २६:६१; २७:४०; मार्क १४:५८; १५:२९

20 यावर यहूदी लोके बोलनात, “हाई मंदिर बांधाले शेचाळीस वरीस लागनात
अनी हाई तुम्हीन तिन दिनमा उभं करशात का?”
21 पण येशु तर आपला शरिरना मंदिरबद्दल सांगी राहींता.
22 जवय तो मरेलस मातीन जिवत व्हयना, तवय हाई त्यानी त्याना शिष्यसले
सांगेल व्हतं, हाई त्यासले आठवणं अनी त्यासनी शास्त्रवर अनं येशुनी जे वचन
सांगेल व्हतं त्यावर ईश्वास ठेवा.

### येशु मनुष्यना ईचार वळखस

23 येशु वल्हांडण सणमा जवय यरूशलेममले व्हता तवय त्यानी करेल चमत्कार
दखीन बराच लोकसनी त्याना नाववर ईश्वास ठेवा.
24 येशुने तर सर्वासले वळख व्हतं त्यामुये त्यानी स्वतःले त्यासना हातमा सोपं
नही.
25 आखो एखादा मनुष्यनी मनुष्यबद्दल साक्ष देवाले पाहिजे अशी त्याले गरज
नव्हती, कारण मनुष्यमा काय शे हाई त्यानी वळख व्हतं.

# 3

### येशु अनी निकदेम

1 परूशी लोकसपैकी निकदेम नावना एक माणुस व्हता, तो यहूदी लोकसना एक
अधिकारी व्हता.
2 तो एक रातले येशुकडे ईसन त्याले बोलना, “गुरजी, तुम्हीन देवकडतीन येल
शिक्षक शेतस हाई माले माहीत शे. कारण ह्या ज्या चमत्कार तुम्हीन करतस त्या
देवसंगे राहवाशिवाय कोणाघाईच करता येवाव नही.”
3 येशुनी त्याले उत्तर दिधं, “मी तुले खरंखरं सांगस; जोपावत नविन जन्म लेस
नही तोपावत कोणलेच देवनं राज्य दखता येस नही.”
4 निकदेम त्याले बोलना, “म्हतारा माणुस पुन्हा कसा जन्म लेवु शकस?
त्यानाघाई त्यानी मायना गर्भमा दुसरींदाव जावाई का अनं जन्म लेवाई का?”
5 येशुनी उत्तर दिधं की, “मी तुले खरंखरं सांगस, पाणीघाई अनी आत्माघाई
जन्म लेवाशिवाय कोणलेच देवना राज्यमा प्रवेश करता येत नही.
6 माणुस मायबापसपाईन शरीरघाई जन्म लेस, अनी आत्माकडतीन आत्मामा
जन्म लेस.
7 तुमले नविन जन्म लेना पडी हाई मी तुले सांगं, म्हणीन आश्चर्य मानु नको.

8 वारा पाहिजे तिकडे वाहस; अनी त्याना आवाज तु ऐकस, पण तो कोठेन येस
अनं कोठे जास हाई तुले कळस नही. जो कोणी आत्मापाईन जन्मेल शे त्यानं असच
शे.''
9 निकदेमनी त्याले ईचारं, ''या गोष्टी कशा होतीन?''
10 येशुनी त्याले उत्तर दिधं, ''तु इस्राएल लोकसना गुरू'' राहीन तुले या गोष्टी
समजतस नही का?
11 मी तुले खरंखरं सांगस; की जे आमले माहित शे ते आम्हीन सांगतस अनी
जे दखेल शे त्याबद्दल साक्ष देतस, अनी तुम्हीन आमनी साक्ष ऐकतस नही.
12 मी पृथ्वीवरल्या गोष्टी तुमले सांगा नंतर तुम्हीन ईश्वास करतस नही; तर मंग
स्वर्गमाधल्या गोष्टी तुमले सांगा नंतर तुम्हीन कशा ईश्वास करशात?
13 स्वर्गमाईन येल मनुष्यना पोर्‍या यानाशिवाय कोणी बी स्वर्गमा वर जायेल
नही.
14 जसं मोशेनी ओसाड प्रदेशमा पितळी सापले खांबवर उंच करं, त्यानामायकच
आवश्यक शे की मनुष्यना पोर्‍याले उंच कराले पाहिजे,
15 याकरता की जो कोणी त्यानावर ईश्वास ठेई त्याले त्यानामा सार्वकालिक
जिवन भेटी.
16 देवनी जगवर ईतली प्रिती करी की त्यानी आपला एकुलता एक पोर्‍या दिधा,
याकरता की जो कोणी त्यानावर ईश्वास ठेवस त्याना नाश व्हणार नही तर त्याले
सार्वकालिक जिवन भेटी.
17 देवनी पोर्‍याले जगना न्यायनिवाडा कराले नही, तर त्यानाद्वारे जगनं तारण
व्हावं म्हणीन धाडेल शे.
18 जो त्यानावर ईश्वास ठेवस त्यानावर न्यायनिवाडानी येळ येवाव नही; पण
जो ईश्वास ठेवस नही त्यासना न्यायनिवाडा पहिलेच व्हयेल शे, कारण त्यासनी
देवना एकुलता एक पोर्‍याना नाववर ईश्वास नही ठेवा.
19 न्यायना निवाडा हाऊच शे की; जगमा प्रकाश येल शे पण लोकसनी
प्रकाशपेक्षा अंधारवर जास्त प्रेम करं, कारण त्यासना कामे दुष्ट व्हतात.
20 जो कोणी दुष्ट कामे करस तो प्रकाशना व्देष करस, अनी आपली दुष्ट कामे
दिसाले नको म्हणीन प्रकाशमा येस नही.
21 पण जो सत्यवर चालस तो प्रकाशकडे येस, याकरता की आपला कामे देवमा
करेल शेतस हाई उघड व्हवाले पाहिजे.

### येशु अनी बाप्तिस्मा करनारा योहान

22 यानंतर येशु अनी त्याना शिष्य यहूदीया प्रांतमा वनात, जठे तो त्यासनासंगे
राहिसन बाप्तिस्मा करे.
23 योहान बी शालिमाजोडेना एनोन आठे बाप्तिस्मा करे, कारण तठे खुप पाणी
व्हतं. लोके त्यानाजोडे जायेत अनी तो त्यासले बाप्तिस्मा दे.
24 ✡कारण तोपावत योहानले कैदखानामा टाकेल नव्हतं.
25 योहानना काही शिष्यसना एक यहूदीसंगे शुध्दीकरणना रितीरिवाजवरतीन
वाद व्हयना.
26 मंग त्या योहानकडे जाईसन त्याले बोलणात, गुरजी, यार्देनना पलीकडे जो
तुमनासंगे व्हता, ज्यानाबद्दल तुम्हीन साक्ष दिधी व्हती? दखा, तो बाप्तिस्मा दि
राहिना अनी सर्व लोके त्यानाजोडे जाई राहिनात!
27 योहाननी उत्तर दिधं, "जोपावत कोणता बी मनुष्यले स्वर्गमातीन काही देतस
नही तोपावत त्याले काहीच भेटस नही.
28 ✡तुम्हीन स्वतः मनी साक्ष देतस, की मी सांगेल व्हतं, मी ख्रिस्त नही शे, पण
त्यानापुढे माले धाडेल शे.
29 नवरदेव तोच शे ज्यानी नवरी शे; पण नवरदेवना मित्र, जो उभं राहिन त्यानं
ऐकस, जवय तो नवरदेवना आवाज ऐकस तवय त्याले भलता आनंद व्हस. असाच
मना आनंद पुर्ण व्हयेल शे.
30 त्यानं महत्व वाढाले पाहिजे अनं मनं महत्व कमी व्हवाले पाहिजे हाई व्हणं
अवश्य शे."

## स्वर्गमाईन येणारा तो कोण शे

31 जो वरतीन येस तो सर्वासपेक्षा श्रेष्ठ शे. जो पृथ्वीपाईन शे तो पृथ्वीना शे अनं
तो पृथ्वीन्या गोष्टी बोलस, पण जो स्वर्गमातीन येस तो सर्वासपेक्षा उंच शे.
32 जे काही त्यानी दखेल अनी ऐकेल शे तो त्यानीच साक्ष देस, पण कोणीच
त्यानी साक्षना स्विकार करस नही.
33 ज्यानी त्याना साक्षना स्विकार करेल शे त्यानी हाई गोष्टवर शिक्का मारेल
शे की, देव सत्य शे.
34 कारण ज्याले देवनी धाडं तो देवना वचने बोलस; कारण तो आत्मा मोजी
मापीसन देस नही.
35 ✡बाप पोऱ्यावर प्रेम करस अनी त्यानी सर्वा काही त्याना हातमा देयल शे.

---

✡ **3:24** ३:२४ मत्तय १४:३; मार्क ६:१७; लूक ३:१९,२० ✡ **3:28** ३:२८ योहान १:२० ✡ **3:35** ३:३५ मत्तय ११:२७; लूक १०:२२

36 जो पोऱ्यावर म्हणजे मनावर ईश्वास ठेवस त्याले सार्वकालिक जिवन शे;
पण जो पोऱ्याले म्हणजे माले मानस नही त्याले जिवन दखाव नही, पण परमेश्वरना
प्रकोप त्यानावर राही.

# 4

## येशु अनी शोमरोनी बाई

1 येशु योहानपेक्षा जास्त शिष्य बनाडीन त्यासना बाप्तिस्मा करी राहीना हाई
परूशी लोकसना कानवर जायेल शे.
2 तरी, येशु स्वतः बाप्तिस्मा नहीं करे; तर त्याना शिष्य करेत.
3 अस जवय येशुले समजनं, तवय तो यहूदीया सोडीन परत गालीलले निंघी
गया;
4 अनी त्याले शोमरोनमातीन जानं पडनं.
5 मंग तो शोमरोन प्रांतमातील सुखार नावना गावले वना तो, याकोबनी आपला
पोऱ्या योसेफले देयल वावरजोडे व्हता.
6 तठे याकोबनी विहिर व्हती, येशु चालता चालता थकना अनं तसाच तो
विहिरजोडे जाईन बसना. त्या येळले जवळपास बारा वाजेल व्हतात.
7 तठे एक शोमरोनी बाई पाणी भराले वनी, येशु तिले बोलना, "माले पेवाले
पाणी दे."
8 त्याना शिष्य जेवण ईकत लेवाले गावमा जायेल व्हतात.
9 तवय ती शोमरोनी बाई त्याले बोलनी, "तु यहूदी राहिसन अनी मी शोमरोनी
तरी बी तु मनाकडे कशा काय पाणी मांगी राहीना?" कारण यहूदी शोमरोनीससंगे
कोणताच प्रकारना व्यवहार करेत नही.
10 येशुनी तिले उत्तर दिधं, "जर तु देवनं दान म्हणजे काय अनी तो कोण शे जो
तुले सांगी राहिना, माले पेवाले पाणी दे, हाई तुले कळतं तर तु त्यानाकडे मांगती,
अनं तो तुले जिवननं पाणी देता."
11 ती बाई त्याले बोलनी, "गुरजी, तुमना जोडे पाणी काढाले बादली नही शे,
अनी विहिर खोल शे, मंग ते जिवत पाणी तुमना जोडे कोठेन?
12 आमना पुर्वज याकोब यानी हाई विहिर आमले देयल शे; तो स्वतः, त्याना
पोऱ्या अनी त्याना गुरढोरं हाई विहिरनं पाणी पेयेत, त्यानापेक्षा तुम्हीन मोठा शेतस
का?"
13 येशुनी तिला उत्तर दिधं, "जो कोणी हाई पाणी पी! त्याले परत तहान लागी,

14 पण मी दिसु ते पाणी जो कोणी पी त्याले परत कधीच तहान लागाव नही, जे
पाणी मी त्याले दिसु, ते त्यामा सार्वकालिक जिवनकरता उसळनारा जिवत पाणीना
झरा असा व्हई.''

15 ती बाई त्याले बोलनी, ''गुरजी, माले तहान लागाले नको अनं माले पाणी
काढाकरता आठपावत येनं पडाले नको, म्हणीन ते पाणी माले द्या.''

16 येशु तिले बोलना, ''तु जाईन तुना नवराले बलाव अनी ईकडे ये.''

17 ती बाई बोलनी, ''माले नवरा नही.'' येशु तिले बोलना, ''माले नवरा नही
हाई तु बराबर बोलनी,

18 कारण तुले पाच नवरा व्हतात अनी आते जो शे तो तुना नवरा नही शे, हाई
तु खरं सांगं.''

19 ती बाई त्याले बोलनी, ''गुरजी, तुम्हीन संदेष्टा शेतस हाई माले आते समजनं.

20 आमना शोमरोनी पुर्वजसंनी याच डोंगरवर देवनी भक्ती करी अनी तुम्हीन
यहूदी म्हणतस, देवनी भक्ती ज्या जागावर कराले पाहिजे ती जागा यरूशलेममा
शे.''

21 येशु तिले बोलना, ''बाई, तुम्हीन देवबापनी भक्ती या डोंगरवर अनी
यरूशलेममा बी करावुत नहीत अशी येळ ई राहीनी, हाई मनं खरं मानी ले.''

22 तुम्हीन शोमरोनीसले माहीत नही असानी भक्ती तुम्हीन करतस; आमले
यहूदीसले माहीत शे असानीच भक्ती आम्हीन करतस, कारण यहूदी लोकसमातीनच
तारण शे.

23 तरी खरा भक्ती करनारा लोके आत्मातीन अनं खरापणतीन देवबापनी भक्ती
करतीन अशी येळ ई राहिनी कदाचित येलच शे, कारण आपली भक्ती करनारा
असा पाहिजेत अशी देवबापनी ईच्छा शे.

24 ''देव आत्मा शे अनी त्याना भक्तसनी त्यानी भक्ती आत्मातीन अनं
खरापणतीन कराले पाहिजे.''

25 ती बाई त्याले बोलनी, ''मसीहा म्हणजे ज्याले ख्रिस्त म्हणतस तो येणार शे
हाई माले माहित शे, तो येवावर आमले सर्व गोष्टी सांगी.''

26 येशु तिले बोलना, ''जो तुनासंगे बोली राहीना तो मीच शे.''

27 इतलामा त्याना शिष्य वनात अनी तो एक बाईसंगे बोली राहिना यानं त्यासले
आश्चर्य वाटनं. तरी बी तिले कोणीच हाई नही ईचार की, तुले काय पाहिजे किंवा
तुम्हीन तिनासंगे का बर बोली राहिना.

28 ती बाई आपलं मडकं टाकीन, गावमा परत जाईन लोकसले सांगाले लागनी,

29 “या चला, त्या माणुसले दखा, ज्यानी मनाबद्दल सर्व सांगं जे मी करेल व्हतं.
हाऊच तर ख्रिस्त नही?”
30 तवय त्या गावमातीन निंघीसन येशुकडे गयात.
31 त्याच येळले शिष्यसनी त्याले ईनंती करी की, “गुरजी, काहीतरी खाई
ल्या!”
32 पण तो त्यासले बोलणा, “तुमले माहीत नही अस जेवण मनाजोडे खावाले
शे.”
33 यावरतीन शिष्य एकमेकसले बोलनात, “कोणी तरी त्यानाकरता जेवण तर
नही लई वना ना?”
34 येशु त्यासले बोलना, “ज्यानी माले धाडेल शे त्याना ईच्छाप्रमाणे करानं अनी
त्यानी माले कार्य पुरं करानं हाईच मनं जेवण शे.”
35 “चार महीना बाकी शेतस मंग कापणी ई” अस तुम्हीन म्हणतस की नही?
दखा, मी तुमले सांगस, आपला डोया वर करीसन वावरे दखा; त्या कापणीकरता
पिकी जायेल शेतस!
36 कापणाराले आते मजुरी भेटी राहीनी अनं सार्वकालिक जिवनकरता पीक
गोया करी राहीना; यानाकरता की पेरणारानी अनं कापणारानी बी संगे आनंद कराले
पाहिजे.
37 “एक पेरस अनं एक कापस” अशी जी म्हण शे आठे ती खरी ठरस.
38 ज्यानाकरता तुम्हीन कष्ट करं नही ते कापाले मी तुमले धाडसु; दुसरासनी
कष्ट करेल शे अनं त्यासना कष्टना तुम्हीन भागीदारी व्हयेल शेतस.
39 “मी करेल सर्व त्यानी माले सांगं,” अशी साक्ष देनारी ती बाईना
बोलनावरतीन त्या गावमधला बराच शोमरोनी लोकसनी येशुवर ईश्वास ठेवा.
40 अनी म्हणीन शोमरोनी त्यानाकडे वनात तवय त्यासनी त्याले, तुम्हीन आमना
आठे मुक्काम करा, अशी ईनंती करी, अनी येशु तठे दोन दिन राहीना.
41 त्याना वचनंसवरतीन आखो कितलातरी लोकसनी ईश्वास धरा,
42 अनी त्या ती बाईले बोलनात, “आते तुना बोलणावरतीनच आम्हीन ईश्वास
धरतस, कारण आम्हीन स्वतः ऐकी लिधं अनी आम्हीन समजी जायेल शेतस की,
हाऊ खरच जगना तारणारा शे.”

## येशु एक अधिकारीना पोर्‍याले बरं करस

43 मंग त्या दोन दिन नंतर येशु तठेन निंघीन गालीलमा गया.

44 ✡कारण येशुनी स्वतः साक्ष दिधी की, “संदेष्टाले स्वतःना देशमा मान भेटस
नही.”
45 ✡जवय तो गालीलमा वना, तवय गालीलकरसनी त्यानं स्वागत करं, कारण
यरूशलेममा सणना येळले जे काही त्यानी करं ते सर्व त्यासनी दखेल व्हतं अनी
त्या बी सणले जायेल व्हतात.
46 ✡मंग येशु गालीलमातीन काना गावले परत वना, तठे त्यानी पाणीना द्राक्षरस
करेल व्हता. तठे राजाना एक अधिकारी व्हता, त्याना पोऱ्या कफर्णहुम गावमा
आजारी व्हता.
47 जवय येशु यहूदीयातीन गालीलले येल शे अस त्या अधिकारीनी ऐकं तवय
तो त्यानाकडे गया, अनी तुम्हीन कफर्णहुमले ईसन मना पोऱ्याले बरं करा अशी
त्यानी त्याले ईनंती करी, कारण तो मराले टेकेल व्हता.
48 त्यावर येशुनी त्याले सांगं, “तुम्हीन चिन्ह अनं चमत्कार दखाशिवाय ईश्वास
ठेवश्यातच नही.”
49 तो अधिकारी त्याले बोलना, “गुरजी, मना पोऱ्या मराना पहिले मनासंगे
चला.”
50 येशुनी त्याले सांगं, “जा; तुना पोऱ्या वाचेल शे!”

तो माणुस येशुना शब्दसवर ईश्वास ठेईन निंघी गया.

51 तो जातांना त्याना दास त्याले भेटीन बोलना, “तुना पोऱ्या वाची जायेल शे!”

52 त्यानी त्याले ईचारं त्याले कोणती येळले बरं वाटाले लागनं, त्यानी त्याले
सांगं, कालदिन एक वाजाले त्याले बरं वाटाले लागनं.
53 तवय त्याना बाप समजी गया की जी येळले येशुनी सांगेल व्हतं की, “तुना
पोऱ्या वाचेल शे,” त्याच येळले हाई व्हईनं मंग त्यानी अनी त्याना सर्व घरानानी
ईश्वास ठेवा.
54 येशुनी यहूदीया मातीन गालीलमा येवावर परत जो दुसरा चमत्कार करा तो
हाऊच.

# 5

## बेथेसदा तलाव जोडेना पांगया माणुस

1 त्यानानंतर यहूदीसना सण व्हता, तवय येशु यरूशलेममले गया.

---

✡ **4:44** ४:४४ मत्तय १३:५७; मार्क ६:४; लूक ४:२४ ✡ **4:45** ४:४५ योहान २:२३ ✡ **4:46** ४:४६ योहान २:१-११

2 यरूशलेममा मेंढरू नावना दरवाजाजोडे एक तलाव शे, त्याले इब्री भाषामा
बेथेसदा म्हणतस; त्यानाजोडे पाच वरांड्या शेतस.
3 त्यामा रोगी, आंधया, लंगडा, लखवा व्हयेल यासनी मोठी गर्दी पडी राहे.
4 *कारण देवदूत प्रत्येक येळले तलावमा उतरीन पाणी हालाये अनी पाणी
हालावानंतर पहिले जो त्यामा जाई त्याले कोणता बी रोग व्हई तो बरा व्हई जाये.
5 तठे अडतीस वरीस पाईन आजारी माणुस व्हता.
6 येशुनी त्याले पडेल दखं अनी त्याले आजारी पडीन बराच दिन व्हयेल व्हतात;
हाई वळखीन तो त्याले बोलना, "तुले बरं व्हवानी ईच्छा शे का?"
7 त्या आजारी माणुसनी त्याले उत्तर दिधं, "गुरजी, पाणी हालनं तवय माले
तलावमा सोडाकरता मनासंगे कोणीच नही; अनी मी जास नही जास तेवढामा दुसरा
कोणी बी मना पहीले उतरी जास."
8 येशु त्याले बोलना, "ऊठ, तुनी चटई उचलीसन चाल."
9 तवय तो माणुस लगेच बरा व्हयना अनं आपली चटई उचलीसन चालाले
लागना.
तो शब्बाथ दिन व्हता.
10 यावरतीन यहूदी लोके त्या बरा व्हयेल माणुसले बोलना, "आज शब्बाथ
दिन शे, तुनं खाट उचलीन चालनं योग्य नही शे."
11 त्यानी त्यासले उत्तर दिधं, "ज्यानी माले बरं करं त्यानीच माले सांगं की,
तुनी खाट उचलीन चाल."
12 त्यासनी त्याले ईचारं, "तुनी खाट उचलीन चाल अस तुले सांगणारा तो
माणुस कोण शे?"
13 तो कोण शे हाई त्या बरा व्हयेल माणुसले माहीत नव्हतं, कारण त्या ठिकाणे
लोकसनी गर्दी व्हती म्हणीन येशु तठेन निसटी गयता.
14 त्यानानंतर येशुनी त्याले मंदिरमा गाठीसन सांगं, "दख, तु आते बरा व्हयेल
शे; आतेपाईन पाप करू नको, करशी तर, तुनं पहीलापेक्षा वाईट व्हई."
15 त्या माणुसनी जाईन यहूदी अधिकारीसले सांगं, "ज्यानी माले बरं करं तो
येशु शे."
16 यामुये त्या यहूदी अधिकारी येशुना मांगे लागनात, कारण तो शब्बाथ दिनले
असा कामे करे.

* **5:4** ५:४ हाई वचन काही मुळ शास्त्रलेखसमा सापडस नही

17 येशुनी त्यासले उत्तर दिधं, “मना बाप आत्तेपावत कामकरी राहीना अनी मी
बी कामकरी राहीनु.”
18 यामुये यहूदी अधिकारीसनी त्याले मारी टाकाकरता जास्तीच खटपट करी;
कारण नुसतं त्यानी शब्बाथ दिनना नियमले मोडं नही, तर तो देवले त्याना बाप
म्हणीसन स्वतःले देवना बराबरीना ठराई राहीना.

## येशुना अधिकार

19 यावर येशुनी त्यासले उत्तर दिधं, “मी तुमले खरंखरं सांगस; पोऱ्या स्वतः
व्हईन काहीच करस नही; मी फक्त तेच करस जे मी मना बापले करतांना दखस;
कारण जे बी बाप करस, तेच पोऱ्या करस.
20 बाप पोऱ्यावर प्रिती करस, तो जे काही करस ते सर्व पोऱ्याले म्हणजे माले
दखाडस; तुमले आश्चर्य वाटाले पाहिजे म्हणीसन तो यानातीन मोठा कामे माले
दखाडी.
21 जसं बाप मरेलसले ऊठाडीन जिवत करस तसा पोऱ्या बी पाहिजे त्याले
जिवत करस.
22 बाप कोणाच न्याय करस नही, तर सर्व न्याय करानं काम त्यानी पोऱ्याकडे
सोपी देयल शे.
23 याकरता की जसं बापना सन्मान करतस तसा पोऱ्याना बी सर्वासनी सन्मान
कराले पाहिजे. जो पोऱ्याना सन्मान करस नही तो, ज्यानी माले धाडेल शे, त्या
बापना सन्मान करस नही.”
24 “मी तुमले खरंखरं सांगस; जो मनं वचन ऐकस अनी ज्यानी माले धाडेल
शे त्यानावर ईश्वास ठेवस त्याले सार्वकालिक जिवन प्राप्त व्हई जायेल शे; अनी
त्यानावर न्यायनी येळ येवाव नही, तो मरणमातीन जिननमा पार जायेल शे.
25 मी तुमले खरंखरं सांगस; अशी येळ ई राहीनी, ती ई जायेल शे, त्यामा मरेल
लोके देवना पोऱ्यानी वाणी ऐकतीन, अनी ज्या ऐकतीन त्या जिवत होतीन.
26 जसं बापमा स्वतःनं जिवन शे, तसं पोऱ्यामा बी स्वतःनं जिवन ऱ्हावाले
पाहिजे अस त्यानी माले दिधं.
27 अनी तो मनुष्यना पोऱ्या शे यामुये न्यायनिवाडा कराना अधिकार त्याले
दिधा.
28 यानाबद्दल आश्चर्य करू नका; कारण अशी येळ ई राहीनी की, त्या येळले
कबरसमातील सर्व लोके मनी वाणी ऐकतीन

29 ज्यासनी सत्कर्म करात त्या जिवनना पुनरूत्थानकरता, अनी ज्यासनी दुष्कर्म
करात त्या न्यायना पुनरूत्थानकरता बाहेर येतीन."

## येशुबद्दल देवामा येल साक्ष

30 "मनाघाई स्वतः व्हईन काहीच करावत नही; जसं मी ऐकस तसाच
न्यायनिवाडा करस, अनी मना न्याय खरा शे, कारण मी मना ईच्छाप्रमाणे नही
तर ज्यानी माले धाडेल शे त्याना ईच्छाप्रमाणे कराले दखस."
31 "मी स्वतःबद्दल साक्ष देस तर मनी साक्ष खरी नही.
32 मनाबद्दल साक्ष देणारा दुसरा शे, अनी जी साक्ष तो मनाबद्दल देस, ती खरी शे
हाई माले माहीत शे.
33 ✡तुम्हीन बाप्तिस्मा करनारा योहानकडे साक्षीदारसले ईचाराले धाडं, अनी
त्यानी जे सत्य त्याबद्दल साक्ष दिधी.
34 मनाबद्दल जी माणससनी साक्ष ती माले नको अस नहीं; पण हाई मी तुमले
यानाकरता सांगस की तुमनं तारण व्हवाले पाहिजे."
35 योहान जळता अनं चमकता दिवानामायक व्हता, अनी तुमले त्याना
प्रकाशमा काही येळ आनंद कराले चांगलं वाटनं.
36 पण जी साक्ष मनी शे ती योहानना साक्षपेक्षा मोठी शे; कारण देवबापनी जे
मोठं कार्य पुरं कराकरता माले सोपेल शे म्हणजे जे कार्य मी करस, तेच मनाबद्दल
साक्ष देस की देवबापनी माले धाडेल शे.
37 ✡आखो ज्या बापनी माले धाडेल शे त्यानीच मनाबद्दल साक्ष देयल शे, तुम्हीन
त्यानी वाणी कधीच ऐकी नही, अनी त्यानं रूप बी दखं नही.
38 त्यानं वचन तुम्हीन तुमना मनमा ठेवं नही, कारण ज्याले त्यानी धाडेल शे
त्यानं तुम्हीन खरं मानतस नही.
39 तुम्हीन शास्त्रलेखमा शोधतस कारण तुम्हीन ईचार करतस की त्यामा
सार्वकालिक जिवन मिळस, अनी त्याच शास्त्रलेख मनाबद्दल साक्ष देतस!
40 तरी जिवनप्राप्ती व्हवाकरता तुमनी मनाकडे येवानी ईच्छा नही.
41 "मी लोकसकडतीन मानपान करी लेस नही.
42 तरी तुमनामा देववरनी प्रिती नही शे, हाई तुमनाबद्दल माले माहीत शे.
43 मी मना पिताना अधिकारतीन येल शे, पण तुम्हीन मना स्विकार करतस नहीं;
जवय, दुसरा कोणी स्वतःना अधिकारतीन येस, तर त्याना तुम्हीन स्विकार करतस.

✡ **5:33** ५:३३ योहान १:१९-२७; ३:२७-३० ✡ **5:37** ५:३७ मत्तय ३:१७; मार्क १:११; लूक ३:२२

44 ज्या तुम्हीन एकमेकसकडतीन मानपान करी लेतस अनी एकच जो देव
त्यानाकडतीन मानपान भेटाकरता खटपट करतस नही; त्या, तुम्हीन मनावर ईश्वास
कसा ठेवतीन?
45 मी पितानासमोर तुमनावर दोष ठेवसु अस समजु नका, तुमनावर दोष ठेवणारा
असा एक माणुस शे, म्हणजे ज्या मोशेवर तुम्हीन आशा ठेल शे तोच.
46 तुम्हीन मोशेना ईश्वास करतात तर मनावर बी ईश्वास करतात, कारण
मनाबद्दल त्यानी लिखेल शे.
47 तुम्हीन त्यानी लिखेल लेखसवर ईश्वास करतस नही, तर मना वचनसवर
कसा ईश्वास धरशात?"

# 6

## पाच हजार लोकसले जेवण देनं

*(मत्तय १४:१३-२१; मार्क ६:३०-४४; लूक ९:१०-१७)*

1 त्यानंतर, येशु गालील समुद्रना, म्हणजे तिबिर्य समुद्रना पलीकडे गया.
2 तवय बराच लोकसनी गर्दी त्यानामांगे चालनी, कारण त्या चमत्कारसले
दखेत ज्या येशु आजारी लोकसवर करे.
3 येशु डोंगरवर जाईन तठे आपला शिष्यससंगे बसना.
4 यहूदी लोकसना वल्हांडण सण जोडे येल व्हता.
5 तवय येशुनी नजर वर करीसन अनं लोकसनी गर्दी आपलाकडे ई राहीना अस
दखीन फिलीप्पले सांगं, "यासले खावाले भाकरी आपण कोठेन ईकत आणान्या?"
6 त्यानी हाई तर फिलीप्पनी परिक्षा दखाकरता सांगं; तो काय कराव शे, हाई
त्याले माहीत व्हतं.
7 फिलीप्पनी उत्तर दिधं, "यासनामातीन प्रत्येकनी थोडं थोडं लिधं तरी दोनशे
चांदिना शिक्कासना* ईकत लेयल भाकरी पुरावत नही."
8 त्याना शिष्यसमातील एकजण, म्हणजे शिमोन पेत्रना भाऊ अंद्रियानी त्याले
सांगं,
9 "आठे एक पोऱ्या शे त्यानाजोडे पाच भाकरी अनं दोन मासा शेतस; पण त्या
ईतलासले कशा पुरतीन."
10 येशु बोलना, "लोकसले बसाडा." तठे बरच गवत व्हतं; तठे बसनारा
माणसनी संख्या जवळपास पाच हजार व्हती.

---

* **6:7** ६:७ दोनशे चांदीना शिक्का तवय आठ महिनानी कमाई व्हती, जवळपास चाळीस हजार रूपया

11 येशुनी त्या भाकरी लिध्यात, अनी देवना उपकार मानीन बठेलसले वाटी
दिध्यात. तसच त्या मासामातीन बी त्यासले पाहिजे तितक दिधं.
12 त्या तृप्त व्हवानंतर, त्यानी आपला शिष्यसले सांगं, “काही बी वाया जावाले
नको; म्हणीन उरेल तुकडा गोया करा.”
13 मंग जेवणारासनं पुरं व्हवानंतर पाच भाकरीसपैकी उरेल तुकडा त्यासनी
गोया कर्‍यात त्या तुकडासना बारा टोपल्या भरण्यात.
14 त्यानी करेल चमत्कार दखीन त्या लोकसनी सांगं, “जगमा येणारा जो संदेष्टा
तो खरोखर हाऊच शे!”
15 मंग त्या ईसन माले राजा कराकरता धराले दखी राहीनात हाई वळखीन येशु
परत डोंगरवर एकटाच निंघी गया.

## येशु पाणीवर चालस

*(मत्तय १४:२२-३३; मार्क ६:४५-५२)*

16 जवय संध्याकाय व्हयनी तवय येशुना शिष्य खाल समुद्रकडे गयात,
17 अनी नावमा बठीसन समुद्रना पलीकडे कफर्णहुमले जाई राहींतात, ईतलामा
अंधार पडना, अनी येशु तोपावत त्यासनाजोडे येल नव्हता.
18 तवय मोठा वादय ऊठनं अनी पाणी खवळाले लागनं.
19 मंग शिष्य पाच ते सहा किलोमीटर वल्हावा मारत मारत गयात तवय त्यासनी
येशुले पाणीवरतीन चालत नावकडे येतांना दखं, अनी त्यासले भिती वाटनी.
20 पण येशु त्यासले बोलना, “भिऊ नका, मी शे!”
21 यामुये त्याले नावमा लेवानी त्यासनी ईच्छा व्हयनी, अनी ईतलामा त्यासले
जठे जावानं व्हतं त्या ठिकाणना किनारावर नाव पोहचनी.

## लोके चिन्ह मांगतस

22 दुसरा रोज जी लोकसनी गर्दी समुद्रना पलीकडे उभी व्हती त्यासनी दखं
की, जी एक नावमा त्याना शिष्य बठेल व्हतात त्यानाशिवाय तठे दुसरी नाव नव्हती,
अनी येशु त्याना शिष्यसंगे ती नावमा बठेल नव्हता, तर त्याना शिष्यच निंघी जायेल
व्हतात.
23 तरी जठे प्रभुनी देवना उपकार मानावर त्या लोकसनी भाकरी खाद्यात तठे
तिबिर्यपाईन दुसरा नाव बी येल व्हत्यात.
24 तठे येशु नही अनी त्याना शिष्य बी नही अस लोकसनी गर्दीनी दखं, तवय
त्या नावमा बठीन येशुना शोध करत कफर्णहुमले वनात.

## येशु जिवननी भाकर

25 जवय येशु त्यासले समुद्रना पलीकडे भेटना तवय त्या त्याले बोलनात,
“गुरजी, आठे कवय वनात?”
26 येशुनी त्यासले उत्तर दिधं, “मी तुमले खरंखरं सांगस, तुम्हीन चमत्कार
दखीन नहीं तर भाकरी खाईसन तृप्त व्हईनात म्हणीसन मना शोध करी राहीनात.”
27 नाशवंत अन्नकरता कष्ट करू नका; तर सार्वकालिक जिवनकरता टिकनारं
जे अन्न मनुष्यना पोऱ्या तुमले दिसु, त्यानाकरता कष्ट करा, कारण बाप जो देव
त्यानी त्यानावर शिक्का मारेल शे.
28 यावर त्यासनी त्याले सांगं, “देवना कामे आमनाकडतीन व्हवाले पाहिजे
म्हणीन आम्हीन काय कराले पाहिजे?”
29 येशुनी त्यासले उत्तर दिधं, “देवनं काम हाईच शे की, ज्याले त्यानी धाडेल
शे त्यानावर तुम्हीन ईश्वास ठेवाना.”
30 यावर त्या त्याले बोलनात, “आम्हीन जे दखीन तुमनावर ईश्वास ठेवाले
पाहिजे असा कोणता चमत्कार तुम्हीन दखाडतस? तुम्हीन काय करावं शेतस?
31 आमना पुर्वजसंनी जंगलमा मान्ना खादा, अस शास्त्रमा लिखेल शे, ‘त्यानी
त्यासले स्वर्गमातीन भाकर खावाले दिधी.’ ”
32 यावर येशुनी त्यासले सांगं, “मी तुमले खरंखरं सांगस, मोशेनी तुमले
स्वर्गमातीन येणारी भाकर दिधी अस नही, मना बाप तर स्वर्गमातीन येणारी खरी
भाकर तुमले देस.
33 कारण जी स्वर्गमातीन उतरस अनं जगले जिवन देस ती देवनी भाकर शे.”
34 त्या त्याले बोलनात, “प्रभुजी, हाई भाकर आमले कायम देत ऱ्हाय.”
35 येशु त्यासले बोलना, “जिवननी भाकर मीच शे, जो मनाकडे येस त्याले
भूक लागाव नहीं; अनी जो मनावर ईश्वास ठेवस त्याले कधीच तहान लागाव नहीं.
36 पण तुम्हीन माले दखं तरी बी ईश्वास ठेवतस नही, अस मी तुमले सांगस.
37 बाप माले जे देस ते सर्व मनाकडे येस अनी जो मनाकडे येस त्याले मी
काढावुच नही.
38 कारण मी आपला ईच्छाप्रमाणे, तर ज्यानी माले धाडेल शे त्याना ईच्छाप्रमाणे
करावं म्हणीन स्वर्गमातीन उतरेल शे.
39 अनी ज्यानी माले धाडेल शे त्यानी ईच्छा हाईच शे की, त्यानी जे सर्व माले
देयल शे त्यामातीन मी काहीच दवाडाले नको, पण शेवटला दिनसमा मी त्यासले
जिवत करीसन ऊठाडाले पाहिजे.

40 मना बापनी हाईच ईच्छा शे की, जो कोणी पोऱ्याले दखीन ईश्वास ठेवस
त्याले सार्वकालिक जिवन प्राप्त व्हवाले पाहिजे, त्याले शेवटला दिन मी ऊठाडसु."
41 "मी स्वर्गमातीन उतरेल भाकर शे" अस तो बोलना म्हणीन यहूदी लोके
त्यानाबद्दल कुरकुर करू लागनात.
42 त्या बोलनात, "योसेफना पोऱ्या येशु, ज्याना मायबाप आपले माहीत शेतस,
तोच हाऊ शे ना? तर तो आते कसा म्हणस की, मी स्वर्गमातीन उतरेल शे?"
43 येशुनी त्यासले उत्तर दिधं, "तुम्हीन आपसमा कुरकुर करू नका.
44 जोपावत ज्यानी माले धाडेल शे तो बाप आपलाकडे ओढी लेस नही तोपावत
मनाजोडे कोणीच येवु शकस नही अनी शेवटला दिनले मी त्याले जिवत करीसन
ऊठाडसु.
45 संदेष्टासना ग्रंथमा अस लिखेल शे की, 'त्या सर्व देवनी शिकाडेल असा
व्हतीन' †जो कोणी बापनं ऐकीन शिकेल शे तोच मनाकडे येस.
46 देवबापले कोणी दखेल शे अस नही जो देवपाईन शे त्यानी मात्र देवबापले
दखेल शे.
47 मी तुमले खरंखरं सांगस; जो ईश्वास धरस त्याले सार्वकालिक जिवन शे.
48 मी जिवननी भाकर शे.
49 तुमना पुर्वजसंनी जंगलमा मान्ना खादा तरी त्या मरणात.
50 पण स्वर्गमातीन उतरेल भाकर अशी शे की, ती कोणी खादी तर तो मरावं
नही.
51 स्वर्गमातीन उतरेल जिवत भाकर मी शे; या भाकरमातीन जो कोणी खाई तो
सर्वकाळ वाची; जी भाकर मी दिसु ती जगना जिवननाकरता मनं शरिरनामायक
शे."
52 यामुये यहूदी लोके आपसमा वादविवाद करीसन बोलु लागनात, "हाऊ
आमले त्यानं शरीर खावाले कसा देवु शकस?"
53 यावर येशु त्यासले बोलना, मी तुमले खरंखरं सांगस, तुम्हीन मनुष्यना
पोऱ्यानं शरीर खादं नही अनी मनं रक्त पिधं नही तर तुमनामा जिवन नही.
54 जो मनं शरीर खास अनं जो मनं रक्त पेस त्याले सार्वकालिक जिवन शे,
त्याले शेवटला दिनले मी ऊठाडसु.
55 कारण मनं शरीर खरं जेवण शे; अनं मनं रक्त खरं पेय शे.
56 जो मनं शरीर खास अनं मनं रक्त पेस तो मनामा ऱ्हास, अनी मी त्यानामा
ऱ्हास.

† **6:45** ६:४५ त्या सर्व देवनी शिकाडेल असा व्हतीन, यशया ५४:१३

57 जसं जिवत देवबापनी माले धाडं, अनी मी देवबापमुये जिवत शे, तसं जो
माले खास तो बी मनामुये वाची.
58 स्वर्गतीन उतरेल जी भाकर ती हाईच शे; हाई तीनामायक नही जी तुमना
पुर्वजसंनी खादी, अनी नंतर मरी गयात, तशी हाई नही; जो हाई भाकर खास तो
सर्वकाळ वाची.
59 त्यानी कफर्णहुम गावमा शिक्षण देतांना सभास्थानमा या गोष्टी सांग्यात.

## सार्वकालिक जिवन देणारा शब्द

60 येशुना शिष्यसपैकी बराच जणसनी हाई ऐकीन सांगं, "हाई शिक्षण कठीण
शे, हाई कोणी मान्य करावुत नहीं?"
61 आपला शिष्य याबद्दल कुरकुर करी राहिनात हाई मनमा वळखीन येशु
त्यासले बोलना, "तुमले यामुये ठोकर लागनी का?
62 मनुष्यना पोऱ्या म्हणजे मी पहिले जठे व्हतु तठे जर तुम्हीन माले वर चढतांना
दखशात, तर काय करशात?
63 जिवत करनारा तो देवना आत्माच शे; शरिरपाईन काही लाभ व्हस नही, मी
ज्या वचनं तुमले सांगेल शेतस त्याच देवना आत्मा अनी जिवन शेतस.
64 तरी तुमनापैकी कितला असा शेतस की त्या ईश्वास धरतस नही." ईश्वास
नही धरनारा कोण अनी आपले धरी देणारा कोण हाई येशुले पहिला पाईन माहीत
व्हतं.
65 मंग तो बोलना, "याकरता मी तुमले सांगेल शे की मना बापपाईन कोणताच
माणुसले हाई देणगी भेटाशिवाय त्यानाघाई मनाकडे येवावस नही."
66 यामुये त्याना शिष्यसपैकी बराचजन परत गयात, त्या परत कधीच त्यानासंगे
चालनात नही.
67 यावरतीन येशु बारा शिष्यसले बोलना, "तुमनी बी निंघी जावानी ईच्छा शे
का?"
68 ✡शिमोन पेत्रनी त्याले उत्तर दिधं, "प्रभुजी, आम्हीन एखादाकडे जावानं?
सार्वकालिक जिवनना वचनं तुमनाकडे शेतस.
69 अनी तुम्हीन देवना पवित्र असा एक शेतस, असा आम्हीन ईश्वास धरेल शे
अनं वळखेल शे."
70 येशुनी त्यासले उत्तर दिधं की, "मी तुमले बारा जणसले निवडं की नही?
तरी तुमनामा एकजण सैतान शे!"

---

✡ **6:68** ६:६८ मत्तय १६:१६; मार्क ८:२९; लूक ९:२०

71 हाई तो शिमोन इस्कर्योत याना पोऱ्या यहुदा यानाबद्दल बोलना, कारण तो
बारा शिष्यसपैकी एक व्हता तो त्याले धरी देणार व्हता.

# 7

## येशु अनी त्याना भाऊ

1 यानंतर, येशु गालीलमा फिरना; यहूदी लोके त्याले माराले दखी राहींतात,
म्हणीन त्याले यहूदीयामा फिरावं अस वाटनं नही.
2 यहूदीसना सण म्हणजे मंडपना सण जोडे येल व्हता.
3 यामुये त्याना भाऊ त्याले बोलनात, "तु आठेन निंघीन यहूदीयामा जाय, म्हणजे
ज्या कामे तु करस त्या तुना शिष्यसनी बी दखाले पाहिजे.
4 ज्याले कोणले प्रसिध्द व्हनं ऱ्हास तो गुपचुप काहीच करस नही; तु या कामे
करस ना तर स्वतः जगले प्रकट व्हय!"
5 त्याना भाऊसनी बी त्यानावर ईश्वास ठेयल नव्हता.
6 यावर येशु त्यासले बोलना, "मनी योग्य येळ अजुन येल नही शे, तुमनी येळ
तर सर्वदा उपयोगी शे.
7 जग तुमना व्देष करस नही, तर मना व्देष करतस, कारण त्यासना कामे वाईट
शेतस अशी मी त्यासनाबद्दल साक्ष देस.
8 तुम्हीन सणमा जा; मनी योग्य येळ आखो पुरी व्हयेल नही शे, म्हणीन मी
आत्तेच या सणले जावाव नही."
9 अस त्यासले सांगीन तो गालीलमा राहीना.

## मंडपना सणमा येशु

10 येशुना भाऊ सणमा गयात त्यानंतर तो बी गया; पण कसा, उघडपणे नही, तर
गुप्तपणे गया.
11 यावरतीन तो कोठे शे अस म्हणत यहूदी लोके त्याना त्या सणमा शोध करू
लागनात.
12 लोकसनी गर्दीमा बी त्यानाबद्दल कुजबूज सुरू व्हयनी कोणी म्हणे, "तो
चांगला माणुस शे," तर कोणी म्हणे, "नही तो लोकसले फसाडस."
13 तरी यहूदीसना भितीमुये त्यानाबद्दल कोणीच उघडउघड बोलनं नही.
14 मंग जवळपास अर्धा सण व्हवानंतर येशु मंदिरमा जाईन शिकाडु लागना.
15 यावरतीन यहूदी लोकसले आश्चर्य वाटनं अनी त्या बोलनात, "हाऊ माणुस
बिना शिक्षण लेता कसा काय ईतला ज्ञानी व्हई गया?"

16 येशुनी त्यासले उत्तर दिधं, “मनी शिकवण हाई मनी नही, तर ज्यानी माले
धाडेल शे, त्या देवनी शे.
17 त्याना ईच्छाप्रमाणे करानं अस जर कोणी मनमा आनं तर हाई शिकवणबद्दल
त्याले समजी की, हाई देवपाईन शे की मी मना मननं बोली राहीनु.
18 जो आपला मननं बोलस तो स्वतःनं गौरव करी लेवाले दखस; पण आपले
ज्यानी धाडेल शे त्याना गौरव जो दखस तो खरा शे, अनी त्यामा काहीच अधर्म
नही शे.
19 मोशेनी नियमशास्त्र दिधं की नहीं? तरी तुमनामा कोणीच नियमशास्त्र पाळस
नही. तुम्हीन माले का बरं मारी टाकाले दखी राहीनात?”
20 लोकसनी गर्दी त्याले बोलनी, “तुले भूत लागेल शे! तुले कोण मारी टाकाले
दखी राहीनात?”
21 येशुनी त्यासले उत्तर दिधं, “मी एक चमत्कार करा, त्यामुये तुम्हीन सर्व
आश्चर्य करतस.
22 सुंता मोशेपाईन नही शे तर पुर्वजसंपाईन शे, म्हणीन मोशेनी ती तुमले लाई
दिधी, अनी तुम्हीन शब्बाथ दिनले पोऱ्यासनी सुंता करतस.
23 ✡मोशेना नियमशास्त्र मोडाले नको म्हणीन मनुष्यना पोऱ्यासनी सुंता शब्बाथ
दिनले व्हस, तर मी शब्बाथ दिनले एक माणुसले पुर्णपणे बरं करं म्हणीन तुम्हीन
मनावर संताप करतस का?
24 तोंड दखीन न्याय करू नका तर धार्मीकतातीन न्याय करा.”

## येशु हाऊ ख्रिस्त शे का?

25 यावरतीन यरूशलेमना लोकसमातीन कितलासनी सांगं, “ज्याले या लोके
मारी टाकाले दखी राहीनात तो हाऊच ना?
26 दखा! तो लोकसमा उघड बोलस, अनी त्या त्याले काहीच बोलतस नही!
अधिकारीसनी खरच हाऊ ख्रिस्त शे हाई वळखी तर नही ना लिधं?
27 तरी हाऊ कोठेन येस हाई आमले सर्वासले माहीत शे, पण ख्रिस्त ई अनी तो
कोठेन ई, हाई कोणलेच कळाव नही.”
28 तवय येशु मंदिरमा शिक्षण देतांना मोठा आवाजमा बोलना, “तुम्हीन माले
वळखतस अनं मी कोठला शे हाई बी तुमले खरच माहीत शे ना? तरी मी स्वतः
व्हईन येल नही शे, पण ज्यानी माले धाडेल शे, तो खरा शे, तुम्हीन त्याले वळखतस
नही.

✡ **7:23** ७:२३ योहान ५:९

29 पण मी त्याले वळखस, कारण मी त्यानापाईन शे अनी त्यानी माले धाडेल
शे.”
30 यावरतीन त्यासनी त्याले धराले दखं, तरी कोणी त्यानावर हात टाका नही,
कारण त्यानी योग्य येळ तोपावत येल नव्हती.
31 तवय लोकसनी गर्दीमातीन बराच लोकसनी त्यानावर ईश्वास ठेवा अनं
बोलनात, “ख्रिस्त ई तवय तो ह्यानी करेल चमत्कारसपेक्षा जास्त चमत्कार करी
का?”

### येशुले धराकरता शिपाईसले धाडतच

32 लोकसनी गर्दीमा त्यानाबद्दल अशी कुजबूज चाली राहीनी हाई परूशीसनी
ऐकं, अनी मुख्य याजक अनं परूशी यासनी त्याले धराकरता कामदार धाडात.
33 येशु बोलना, “मी आखो थोडा येळ तुमनासंगे शे, मंग ज्यानी माले धाडेल
शे त्यानाकडे मी निंघी जासु.
34 तुम्हीन मना शोध करशात, पण मी तुमले सापडावु नही, कारण जठे मी ऱ्हासु
तठे तुमनाघाई येवावनार नही.”
35 यामुये यहूदी लोके आपसमा बोलनात, “हाऊ असा कोठे जाई की तो आपले
सापडावं नही? तो गैरयहूदी लोकसमा पांगी जायेल आपला यहूदी लोकसकडे जाई
अनी गैरयहूदी लोकसले शिकाडी का?
36 तुम्हीन मना शोध करशात तरी मी तुमले सापडावं नही, अनी जठे मी ऱ्हासु
तठे तुमनाघाई येवावनार नही, हाई जे त्यानी सांगं ते नेमकं काय शे?”

### जिवत पाणी

37 मंग सणना शेवटला म्हणजे महत्त्वना दिनले येशु उभा राहिन मोठा आवाजमा
बोलना, “कोणी तिशा व्हई तर त्यानी मनाकडे ईसन पाणी पेवानं.
38 जो मनावर ईश्वास ठेवस त्यानामातीन शास्त्रमा सांगेल प्रमाणे, ‘जिवत पाणीन्या
नद्या वाहतीन.’ ”
39 ज्यासनी त्यानावर ईश्वास ठेवा त्यासले पवित्र आत्मा मिळणार व्हता
त्यासनाबद्दल येशु हाई बोलना; यामुये की पवित्र आत्मानं दान आत्तेपावत देवाई
जायेल नव्हतं, कारण येशु अजुन त्याना गौरवमा उचलाई जायेल नव्हता.

### लोकसमा फुट पडस

40 लोकसना गर्दीमातीन कितला जन ह्या शब्द ऐकीसन बोलनात, “हाऊ माणुस
खरोखर संदेष्टा शे!”
41 कितलासनी सांगं, “हाऊ ख्रिस्त शे!”

काहीसनी सांगं, “ख्रिस्त गालीलमातीन येवाव शे का?”
42 ख्रिस्त दावींदना वंशना अनं ज्या बेथलहेम गावना दावीद व्हता, त्या गावना
असा येवाव शे अस धर्मशास्त्रमा सांगेल नही शे का?
43 यावरतीन येशुबद्दल लोकसनी त्या गर्दीमा फुट पडनी.
44 त्यामातीन कितला जन तर त्याले धराले दखी राहींतात, तरी कोणी त्यानावर
हात टाका नही.

## यहूदी अधिकारीसना अईश्वास

45 जवय मुख्य याजक अनी परूशीसकडे शिपाई परत वनात, शिपाईसले त्या
बोलनात, “तुम्हीन त्याले का बरं आणं नही?”
46 शिपाईसनी उत्तर दिधं, “जसं तो बोलस तसा कोणीच माणुस कधीच
त्यानामायक बोलना नही!”
47 परूशीसनी त्यासले सांगं, “तुम्हीन बी फसनात का?
48 अधिकारीसपैकी किंवा परूशीसपैकी एकनी तरी त्यानावर ईश्वास ठेयल शे
का?
49 जी हाई लोकसनी गर्दीले नियमशास्त्र माहीत नही, त्या देवना शापमा शेतस!”
50 ✡येशुकडे पहिले ई जायेल निकदेम हाऊ परूशीसपैकीच एक व्हता, तो
त्यासले बोलना,
51 “कोणतरी ऐकी लेवाशिवाय अनं तो काय करस यानी माहीती करी
लेवाशिवाय आपलं नियमशास्त्र त्याले दोषी ठरावस का?”
52 त्यासनी त्याले उत्तर दिधं, “तु बी गालीलना शे का? शोध करीसन दख की
गालीलमा कोणताच संदेष्टा उत्पन्न व्हस नही.”
53 मंग त्या सर्व आपआपला घर निंघी गयात.

# 8

## व्यभिचारी बाई

1 *येशु जैतुन नावना डोंगरकडे गया.
2 नंतर पहाटले तो परत मंदिरमा वना तवय सर्व लोके त्यानाकडे वनात, अनी
तो बशीन त्यासले शिकाडु लागना.
3 त्या येळले शास्त्री अनी परूशी यासनी व्यभिचार करतांना धरेल एक बाईले
त्यानाकडे लई वनात अनं तिले मझार उभं करं.

---

✡ **7:50** ७:५० योहान ३:१,२ * **8:1** ८:१ हाई मुळ शास्त्रलेखसमा नही शे

4 त्या येशुले बोलनात, “गुरजी, हाई बाईले व्यभिचार करतांना धरेल शे.
5 मोशेनी नियमशास्त्रमा अस सांगेल शे की, असासले दगडमार कराना; तर
तुम्हीन तिनाबद्दल काय सांगतस?”
6 त्यानावर दोष ठेवाले आपले काहीतरी निमित्त भेटी, म्हणीन त्यानी परिक्षा
दखाकरता त्यासनी हाई सांगं; पण येशु तर खाल वाकीन बोटघाई जमीनवर लिखु
लागना.
7 अनी त्या त्याले एकसारख ईचारी राहींतात तवय तो ऊठीसन त्यासले बोलना,
“तुमनामा जो निष्पाप व्हई त्यानी पहिले तिनावर दगड टाकाना.”
8 मंग तो परत खाल वाकीन जमीनवर लिखु लागना.
9 हाई ऐकीन वडील लोकसपाईन सुरवात करीसन शेवटला माणुसपावत एकना
मांगे एक असा त्या सर्व निंघी गयात; येशु एकटाच राहीना अनी तठेच ती बाई
मझार उभी व्हती.
10 नंतर येशु सिधा उभा राहीना अनी ती बाईले बोलना, “बाई, तुले दोष देणारा
त्या कोठे शेतस? तुनाकरता कोणी दंड ठरावा नही का?”
11 ती बोलनी, “प्रभुजी, कोणीच नही” तवय येशु तिले बोलना, “मी बी
तुनाकरता दंड ठरावस नही, जाय, पण यापुढे पाप करू नको.”

### येशु जगना प्रकाश

12 ✡येशु परत परूशीसले बोलना, “मी जगना प्रकाश शे, जो मनामांगे चालस
तो अंधारामा चालावं नही, तर त्यानाजोडे जिवनना प्रकाश राही.”
13 ✡यावरतीन परूशी त्याले बोलनात, “तुम्हीन स्वतःबद्दल साक्ष देतस; तुमनी
साक्ष खरी नही शे.”
14 येशुनी त्यासले उत्तर दिधं, “मी स्वतःबद्दल साक्ष देस, तरी मनी साक्ष खरी
शे, कारण मी कोठेन वनु अनी कोठे जासु हाई माले माहीत शे; मी कोठेन येस अनी
कोठे जास हाई तुमले माहीत नही.
15 तुम्हीन लोके मनुष्य रितीनुसार न्याय करतस; मी कोणा न्याय करस नही.
16 अनी जर मी लोकसना न्याय करा तर मना न्याय खरा शे; कारण मी एकला
नही तर मी अनं ज्यानी माले धाडेल शे तो असा शेतस.
17 तुमना नियमशास्त्रमा अस लिखेल शे की, दोन लोकसनी साक्ष खरी शे.
18 मी स्वतःबद्दल साक्ष देणारा शे, अनी ज्या बापनी माले धाडेल शे तो बी
मनाबद्दल साक्ष देस.”

---

✡ **8:12** ८:१२ मत्तय ५:१४; योहान ९:५ ✡ **8:13** ८:१३ योहान ५:३१

19 यावरतीन त्या त्याले बोलनात, “तुमना बाप कोठे शे?” येशुनी उत्तर दिधं,
“तुम्हीन माले अनी मना बापले वळखतस नही, तुम्हीन माले वळखं तर, मना बापले
बी वळखशात.”
20 तो मंदिरमा शिकाडी राहींता तवय हाई वचन जठे दानपेटी ठेयल व्हती त्या
खोलीमा बोलना; तरी कोणीच त्याले धरं नहीं, कारण त्यानी योग्य येळ तोपावत
येल नव्हती.

## जठे मी जाई ऱ्हाईनु तठे तुमले येता येवाव नही

21 मंग येशु परत त्यासले बोलना, “मी जासु, तुम्हीन मना शोध करशात पण
तुम्हीन आपला पापमा मरशात, जठे मी जाई राहीनु तठे तुमले येता येवाव नही.”
22 यावर यहूदी लोके बोलनात, “जठे मी जासु तठे तुमले येता येवाव नही अस
हाऊ म्हणस, यावरतीन हाऊ स्वतःना जीव तर नही लेवाव शे ना?”
23 येशुनी उत्तर दिधं, “तुम्हीन खालना शेतस, मी वरना शे, तुम्हीन या जगना
शेतस, मी या जगना नही.
24 यामुये मी तुमले सांगस की तुम्हीन आपला पापमा मरशात; कारण मी जो शे
तो शे असा ईश्वास तुम्हीन धरा नही तर तुम्हीन आपला पापमा मरशात.”
25 त्या त्याले बोलनात, “तु कोण शे?”
येशुनी त्यासले उत्तर दिधं, “जे मी सुरवात पाईन तुमले सांगत वनु तोच.
26 तुमनाबद्दल माले बरच बोलनं शे अनं न्यायनिवाडा कराना शे, पण ज्यानी
माले धाडेल शे तो खरा शे अनी ज्या गोष्टी मी त्यानाकडतीन ऐक्यात त्याच मी
जगले सांगस.”
27 तो आपलासंगे पिताबद्दल बोली राहीना हाई त्यासले समजनं नही.
28 यामुये येशु त्यासले बोलना, “जवय तुम्हीन मनुष्यना पोऱ्याले उंच करशात
तवय तुमले समजी की ‘मी जो शे तो शे!’ अनी मी स्वतः व्हईन काय करस नही,
तर पितानी माले सांगाप्रमाणे मी या गोष्टी बोलस.
29 ज्यानी माले धाडेल शे तो मनासंगे शे; त्यानी माले एकलं सोडेल नही, कारण
जे त्याले आवडस ते मी कायम करस.”
30 तो या गोष्टी बोली राहींता तवय बराचसा लोकसनी त्यानावर ईश्वास ठेवा.

## सत्य तुमले स्वतंत्र करी

31 तवय येशु त्या यहूदीसले ज्यासनी त्यानावर ईश्वास ठेवा त्यासले बोलना,
“तुम्हीन मना वचनंसमा राहीनात तर, खरोखर मना शिष्य शेतस;
32 तुमले सत्य समजी, अनं सत्य तुमले स्वतंत्र करी.”

33 ✡त्यासनी त्याले सांगं, "आम्हीन अब्राहामना वंशज शेतस, अनं कधीच
कोणी गुलामगिरीमा नव्हतुत, तर तुम्हीन स्वतंत्र व्हशात अस तुम्हीन कसं
म्हणतस?"
34 येशुनी त्यासले उत्तर दिधं, "मी तुमले खरंखरं सांगस, जो कोणी पाप करस
तो पापना गुलाम शे.
35 गुलाम घरमा सदासर्वदा ऱ्हास नही, पोऱ्या सदासर्वदा ऱ्हास.
36 यामुये पोऱ्या तुमले स्वतंत्र करी, तर तुम्हीन खरा स्वतंत्र व्हशात.
37 तुम्हीन अब्राहामना वंशज शेतस हाई माले माहीत शे तरी तुमनामा मना
वचनंसले जागा नही, म्हणीसन तुम्हीन मना जीव लेवाकरता दखी राहीनात.
38 मी बापजोडे जे दखस ते बोलस, तसच तुम्हीन तुमना बापकडतीन जे ऐकतस
ते करतस."
39 त्यासनी त्याले उत्तर दिधं, "आमना बाप अब्राहाम शे."
येशु त्यासले बोलना, "तुम्हीन अब्राहामना पोऱ्या राहतात तर तुम्हीन अब्राहामनी
करेल कार्य करतस.
40 पण ज्यानी देवपाईन ऐकेल सत्य तुमले सांगं त्या माणुसले, तुम्हीन आते मारी
टाकाकरता दखी राहीनात; अब्राहामनी अस करं नही!
41 तुम्हीन तुमना बापनं कार्य करी राहीनात."
त्या बोलनात, "आमना एकच बाप, म्हणजे देव शे, अनी आम्हीन त्याना खरा
पोऱ्या शेतस."
42 येशुनी त्यासले सांगं, "देव जर तुमना बाप ऱ्हाता तर तुम्हीन मनावर प्रिती
करतात; कारण मी देवपाईन निंघेल अनी येल शे, मी स्वतःवहीन येल नही शे, तर
त्यानी माले धाडेल शे.
43 तुम्हीन मनं बोलनं का बरं समजी लेतस नही? यानं कारण अस की तुमनाघाई
मन वचन ऐकावस नही
44 तुम्हीन आपला बाप सैतान यानापाईन व्हयेल शेतस, अनी आपला बापना
वासनाना मायक कराले दखतस; तो सुरवात पाईन मनुष्यघातक शे, अनी तो सत्यमा
टिकना नही, कारण त्यानामा सत्यच नही शे, तो खोटं बोलस ते स्वतःव्हईनच
बोलस, कारण तो लबाड अनी लबाडना बाप शे.
45 मी तर तुमले सत्य सांगस, म्हणीसन तुम्हीन मना ईश्वास धरतस नही.
46 तुमना मातीन कोण माले पापी ठरावु शकस? जर मी खरं बोलस तर, तुम्हीन
का बरं मनावर ईश्वास ठेवतस नही?

✡ **8:33** ८:३३ मत्तय ३:९; लूक ३:८

47 जो देवकडला शे तो देवन्या गोष्टी ऐकस; तुम्हीन देवकडला नही म्हणीन
तुम्हीन ऐकतस नही.”

## येशु अनी अब्राहाम

48 यहूदी लोकसनी त्याले उत्तर दिधं, “आम्हीन खरं बोलतस की नही, तु
शोमरोनी शे अनं तुले भूत लागेल शे?”
49 येशुनी उत्तर दिधं, “माले भूत लागेल नही, तर मी मना बापना सन्मान करस
अनी तुम्हीन मना अपमान करतस.
50 मी स्वतःना गौरव कराले दखस नही, मना गौरव अनं न्यायनिवाडा करनारा
एकजण शे.
51 मी तुमले खरंखरं सांगस; जर कोणी मनं वचन पाळी तर तो कधीच मराव
नही.”
52 यहूदी लोके त्याले बोलनात, “तुले भूत लागेल शे हाई आते आमले समजी
गयं! अब्राहाम अनी संदेष्टा बी मरी गयात अनी तु म्हणस, जर कोणी मनं वचन
पाळी तर त्याले मरणना अनुभव कधीच येवाव नही.
53 आमना बाप अब्राहाम मरी गया त्यानापेक्षा तु मोठा शे का? संदेष्टा बी मरी
गयात; तु स्वतःले कोण समजस?”
54 येशुनी उत्तर दिधं, “मी स्वतःनं गौरव करी लिधं तर ते काय मनं गौरव नही;
मना गौरव करनारा मना बाप शे, ज्याले तुम्हीन तो आमना देव शे अस म्हणतस.
55 तरी तुम्हीन त्याले वळख नही, पण मी त्याले वळखस; अनी जर मी त्याले
वळखस नही अस म्हणसु तर तुमनामायक लबाड व्हसु; पण मी त्याले वळखस
अनी त्यानं वचन पाळस.
56 तुमना बाप अब्राहाम मना दिन दखानी आशातीन आनंदीत व्हयना अनी ते
दखीन त्याले आनंद व्हयना.”
57 यावरतीन यहूदी लोके त्याले बोलनात, “आखो तुले पन्नास वरीस व्हयनात
नही अनी तु अब्राहामले दखेल शे?”
58 येशुनी त्यासले सांगं, “मी तुमले खरंखरं सांगस, अब्राहाम व्हयना त्याना
पहीलापाईन ‘मी शे.’ ”
59 यावरतीन त्यासनी येशुवर फेकाकरता दगड उचलात, पण येशु गुपचुप
मंदिरमातीन बाहेर निंघी गया.

# 9

## येशु जन्मांध माणुसले बरा करस

1 मंग जातांना येशुनी एक जन्मांध *माणुसले दखं.
2 तवय त्याना शिष्यसनी त्याले ईचारं, "गुरजी, यानी आंधया जन्मले यावं अस
पाप कोणी करं? त्यानी की, त्याना मायबापनी?"
3 येशुनी उत्तर दिधं, "यानी किंवा याना मायबापनी पाप करं अस नही, तर
यानामा देवनं कार्य प्रकट व्हवाले पाहिजे म्हणीसन हाऊ आंधया जन्मना.
4 माले ज्यानी धाडेल शे, त्यानं काम दिन शे तोपावत आपण कराले पाहिजे; रात
व्हवाव शे त्यामा कोणाघाईच कामकरता येवाव नही.
5 ✡✡मी जगमा शे, तोपावत मी जगना प्रकाश शे."
6 अस बोलीन येशु जमीनवर थुंकना, थुंकीघाई त्यानी चिखल करा; तो चिखल
त्याना डोयाले लावा.
7 अनी त्याले सांगं, "जाय अनी शिलोह †तळामा धोय," मंग त्यानी जाईन
तोंड धुवानंतर तो डोळस व्हईसन परत वना.
8 यावरतीन त्याना शेजारी अनी ज्यासनी त्याले भिकारी अस पहिले दखेल व्हतं
त्या बोलनात, "बठीसन भिक मांगणारा तो हाऊच शे नही का?"
9 काहीजण बोलनात, "तो हाऊच शे," पण बाकीना बोलनात, नही, तो
त्यानामायक शे;
तो माणुस बोलना, "मी तोच शे."
10 यावरतीन त्यासनी त्याले सांगं, "तुना डोया कसा उघडनात?"
11 तो बोलना, "येशु नावना माणुसनी चिखल करीसन, मना डोयासले लावा,
अनी माले सांगं, 'शिलोहवर जाईन धोय' मी जाईन धोवात अनी माले दिसाले
लागनं."
12 तवय त्यासनी त्याले ईचारं, "तो कोठे शे?" तो बोलना, "माले माहीत
नही."

## परूशीस् कडतीन तपासनी

13 मंग जो पहिले आंधया व्हता त्याले लोके परूशीसकडे लई गयात.
14 ज्या दिन येशुनी चिखल करीसन त्याना डोया उघडात, तो दिन यहूदीसना
शब्बाथ दिन व्हता.

* 9:1 9:1 जन्मांध जन्मपाईन आंधया ✡ 9:5 ९:५ मत्तय ५:१४; योहान ८:१२ ✡ 9:5 ९:५ मत्तय ५:१४; योहान ८:१२ † 9:7 9:7 शिलोह नावना अर्थ म्हणजे धाडेल

15 यामुये परूशीसनी त्याले परत ईचारं, “तुले दृष्टी कशी वनी?” तो त्यासले
बोलना, “त्यानी मना डोयाले चिखल लावा, तो मी धोवानंतर माले दिसाले लागनं.”
16 यावरतीन परूशीसमातील काहीजण बोलनात, “तो माणुस देवपाईन नही,
कारण तो शब्बाथ दिन पाळस नही.” दुसरा बोलनात, “पापी माणुसकडतीन असा
चमत्कार कशा कराई?” अशी त्यासनामा फुट पडनी.
17 यामुये त्या परत त्या आंधया माणुसले बोलनात, “त्यानी तुना डोया उघडात
तर त्यानाबद्दल तुनं काय म्हणनं शे?” त्यानी सांगं, “तो संदेष्टा शे”
18 यहूदी अधिकारीसनी दृष्टी प्राप्त व्हयेल त्या माणुसना माय बापले बलाईन
ईचारपुस करापावत तो आंधया व्हता आते डोळस व्हई जायेल शे, हाई खरं मानं
नही.
19 त्यासनी त्यासले ईचारं, “जो तुमना पोऱ्या आंधया जन्मना अस तुम्हीन
म्हणतस तो हाऊच का? तर त्याले आते कसं दखास?”
20 त्याना मायबापनी उत्तर दिधं, “हाऊ आमना पोऱ्या शे अनं तो आंधया जन्मना
हाई आमले माहीत शे.
21 तरी बी त्याले आते कसं दखास हाई आमले माहीत नही, किंवा त्याना डोया
कोणी उघडात हाई बी आमले माहीत नही, त्यालेच ईचारा; तो समजदार शे, तो
स्वतःबद्दल सांगी!”
22 त्याना मायबाप यहूदी अधिकारीसले घाबरेत म्हणीसन त्यासनी अस सांगं,
कारण येशु हाऊ ख्रिस्त शे अस जर कोणी स्विकारं तर त्याले सभास्थानमातीन काढी
टाकानं अशी यहूदीसनी पहिलेच एकी करेल व्हती.
23 यामुये त्याना मायबापनी सांगं, “तो समजदार व्हयेल शे; त्यालेच ईचारा!”
24 मंग जो माणुस पहिले आंधया व्हता त्याले त्यासनी दुसरींदाव बलाईन सांगं,
“देवना समोर हाई शपथ ले अनी आमले खरं सांग! आमले माहीत शे की ज्यानी
तुले बरं करं तो माणुस पापी शे.”
25 यावरतीन त्यानी उत्तर दिधं, “तो पापी शे किंवा नही हाई माले माहीत नही;
पण माले एक माहीत शे की पहिले मी आंधया व्हतु अनी आते माले दिसस.”
26 त्यासनी त्याले ईचारं, “त्यानी तुले काय करं? त्यानी तुले बरं कसं करं तुना
डोया कसा उघडात?”
27 त्यानी त्यासले उत्तर दिधं, “आत्तेच मी तुमले सांगं तरी तुम्हीन ऐकं नही;
परत ऐकानी ईच्छा का बरं करतस? तुम्हीन बी त्याना शिष्य व्हवाले दखी राहिनात
का?”

28 तवय त्यासनी त्याना अपमान करीसन सांगं, “तु त्याना शिष्य शे; पण
आम्हीन मोशेना शिष्य शेतस.
29 देव मोशेसंगे बोलेल शे हाई आमले माहीत शे; पण यानाबद्दल आमले माहीत
नही हाऊ कोठला शे!”
30 त्या माणुसनी उत्तर दिधं, “हाईच मोठं आश्चर्य शे की तो कोठला शे! हाई
तुमले माहीत नही, पण त्यानी तर मना डोया उघडात!
31 आपले माहीत शे की देव पापी लोकसनं ऐकस नही; तर जो कोणी देवना
आदर करस अनी त्याना ईच्छाप्रमाणे वागस त्यानं तो ऐकस.
32 जन्मांधना डोया कोणी उघडात, अस युगना सुरवात पाईन कधीच ऐकामा
येल नव्हतं.
33 हाऊ जर देवपाईन नही ऱ्हाता तर ह्यानाघाई काहीच व्हतं नही.”
34 त्यासनी त्याले सांगं, “तु तर पापमाच जन्मेल शे अनी तु आमले शिकाडस
का?” मंग त्यासनी त्याले सभास्थानमातीन बाहेर हाकली दिधं.

### आत्मिक आंधयपण

35 त्यासनी त्याले बाहेर हाकली दिधं, हाई ऐकावर येशुनी त्याले भेटीन ईचारं,
“तु मनुष्यना पोऱ्यावर ईश्वास ठेवस का?”
36 त्या माणुसनी उत्तर दिधं, “प्रभुजी, असा तो कोण शे की मी त्यानावर ईश्वास
ठेऊ!”
37 येशुनी त्याले सांगं, “तु त्याले दखेल शे अनी तो एक असा शे जो आते
तुनासंगे बोली राहीना.”
38 तो बोलना, “प्रभुजी! मी ईश्वास ठेवस” अनी त्यानी येशु समोर नमन करं.
39 तवय येशु बोलना, “मी न्यायनिवाडा कराकरता या जगमा वनु, यानाकरता
की ज्यासले दखास नही त्यासनी दखावं, अनी ज्यासले दखास त्यासनी अंधयं
व्हावं.”
40 परूशीसमातील काहीजण त्यानाजोडे व्हतात त्यासनी हाई ऐकीन त्याले
ईचारं, “आम्हीन बी आंधया शेतस का?”
41 येशुनी त्यासले उत्तर दिधं, “जर तुम्हीन आंधया ऱ्हातात तर तुमनामा कोणतच
पाप नही ऱ्हातं; पण आमले दखास अस तुम्हीन आते म्हणतस, म्हणीन तुमनं पाप
तसच ऱ्हास.”

# 10

### मेंढपायना दृष्टांत

1 येशु बोलना, “मी तुमले खरंखरं सांगस, जो मेंढरसना वाडामा दारघाई मझार
नही जाता दुसरी कडतीन चढीन जास तो चोर अनी लुटारू शे.”
2 जो दारमाईन मझार जास तो मेंढरसना मेंढपाय शे.
3 व्दारपाळ त्यानाकरता दार उघडस; मेंढरं त्यानी वाणी ऐकतस, तो आपला
मेंढरसले ज्याना त्याना नावतीन हाक मारस अनी त्यासले बाहेर लई जास.
4 अनी जवय तो आपला सर्व मेंढरं बाहेर काढानंतर तो त्यासनापुढे चालस, अनी
मेंढरं त्याना मांगे चालतस, कारण त्या त्यानी वाणी वळखतस
5 त्या परकाना मांगे जावावुत नही; तर त्यानापाईन पयतीन, कारण त्या परकानी
वाणी वळखतस नही.
6 हाऊ दृष्टांत येशुनी त्यासले सांगा, तरी ज्या गोष्टी तो त्यासनासंगे बोलना त्या
काय शेतस हाई त्यासले समजनं नही.

## येशु उत्तम मेंढपाय

7 यामुये येशु त्यासले परत बोलना, “मी तुमले खरंखरं सांगस; की मी मेंढरंसना
दार शे.
8 ज्या मना पहीले वनात त्या सर्व चोर अनी लुटारू शेतस, त्यासनी आज्ञा
मेंढरंसनी ऐकी नही.
9 मी दार शे; मनाद्वारे कोणी मझार जाई तर त्या वाचतीन; त्या मझार येतीन अनं
बाहेर जातीन अनी त्यासले चारा खावाले भेटी.
10 चोर येस तो फक्त चोरी, घात अनी नाश कराना या हेतुतीन येस; मी
यानाकरता येल शे की, त्यासले जिवन भेटावं अनी भरपुर भेटावं.”
11 “मीच उत्तम मेंढपाय शे, उत्तम मेंढरंसकरता आपला जीव देस.
12 जो मेंढपाय नही अनी ज्याना स्वतःना मेंढरं नहीत, असा मजुर जो ऱ्हास,
तो लांडगाले येतांना दखीन पळी जास; अनी लांडगा त्यासनावर झडप घालीन
मेंढरसनी दाणादाण करस.
13 मजुर पळी जास कारण तो मजुरच शे अनी त्याले मेंढरंसनी काळजी नही.
14 ✡मी उत्तम मेंढपाय शे, मना मेंढरंसले मी वळखस अनी मना मेढरं माले
वळखतस.
15 तसच जसं बाप माले वळखस अनी मी बापले वळखस अनी मी
मेंढरंसनाकरता मना जीव देस.

✡ **10:14** १०:१४ मत्तय ११:२७; लूक १०:२२

16 ज्या मेंढवाडामधला नहीत असा मना दुसरा बी मेंढरं शेतस, माले त्यासले बी
आणनं शे; त्या मनी वाणी ऐकतीन, मंग एक कळप, एक मेंढपाय अस व्हई.”
17 “बाप मनावर प्रेम करस कारण की, मी मना जीव परत लेवाकरता देस.
18 कोणी मनाकडतीन जिवन हिसकावु नही शकस, तर मी ते स्वतःवहीन देस;
माले जिवन देवाना बी अधिकार शे अनी ते परत लेवाना बी अधिकार शे, हाई आज्ञा
माले मना बापकडतीन प्राप्त व्हयेल शे.”
19 या शब्दसवरतीन यहूदी लोकसमा परत फुट पडनी.
20 त्यासनामातीन बराचजन बोलनात, “त्याले भूत लागेल शे! तो येडा शे!
त्यानं तुम्हीन का बरं ऐकतस?”
21 पण बाकीना बोलनात, “ह्या वचनं भूत लागेलना नहीत, भूतले आंधयाना
डोया उघडता येतस का?”

### येशुले नाकारनं

22 जवय हिवाळा व्हता तवय यरूशलेममा मंदिरना अर्पणना सण साजरा व्हई
राहिंता.
23 अनी येशु मंदिरमझार शलमोनना वरांडामा फिरी राहींता,
24 तवय यहूदी लोकसनी त्याले घेरी लिधं अनी सांगं, “तु कोठपावत आमले
संशयमा ठेवशी? तु ख्रिस्त व्हशी तर आमले स्पष्ट सांग.”
25 येशुनी त्यासले उत्तर दिधं, “मी तुमले सांगं तरी तुम्हीन ईश्वास ठेवतस नही;
ज्या कामे मी मना बापना अधिकारतीन करस त्या मनाबद्दल साक्ष देतस;
26 तुम्हीन ईश्वास ठेवतस नही, कारण तुम्हीन मना मेंढरंसपैकी नही
27 मना मेंढरं मनी वाणी ऐकतस; मी त्यासले वळखस अनं त्या मनामांगे येतस.
28 मी त्यासले सार्वकालिक जिवन देस, त्यासना कधीच नाश व्हवाव नही,
अनी कोणी त्यासले मनाकडतीन हिसकाई लेवाव नही.
29 ज्यानी त्या माले देयल शेतस तो मना बाप सर्वातीन मोठा शे अनी बापकडतीन
त्यासले कोणाघाईच हिसकाईन लई जाता येवाव नही.
30 मी अनी बाप *एकच शे.”
31 तवय यहूदी लोकसनी त्याले दगडमार कराकरता परत दगडी उचलात.
32 येशुनी त्यासले सांगं, “मी बापनी सांगेल बराचसा चांगला कामे तुमले
दखाडेल शेतस; त्यामातीन कोणता काममुये तुम्हीन मानावर दगडमार कराले दखी
राहिनात?”

---

* **10:30 10:30** बाप देवबाप

33 त्यासनी त्याले उत्तर दिधं, “चांगला कामसकरता आम्हीन तुले दगडमार
करतस नही, पण तु देवनी निंदा करस त्याकरता, तु मानव राहीसन स्वतःले देव
म्हणी लेस यानाकरता.”
34 येशुनी त्यासले उत्तर दिधं, “तुमना नियमशास्त्रमा असं लिखेल शे, ज्यामा
देव सांगसं की, ‘तुम्हीन देव शेतस.’ ”
35 आमले माहीत शे की, शास्त्रमा जे म्हणेल शे ते सत्य शे, ज्यासले देवनं वचन
प्राप्त व्हयनं त्यासले त्यानी देव म्हणेल शे.
36 तर ज्याले बापनी नेमीन जगमा धाडं त्याले म्हणजे माले, मी देवना पोऱ्या शे
अस सांगामुये, मी देवनी निंदा करस अस तुम्हीन म्हणतस का?
37 मी मना बापनी सोपेल कामे करस नही व्हई तर मना ईश्वास करू नका.
38 पण मी जर काम करस तरी मना ईश्वास करू नका, पण त्या कामसमुये तरी
ईश्वास ठेवा अनी वळखीन समजी ल्या की, “बाप मनामा शे अनी मी बापमा शे.”
39 त्या परत त्याले धराले दखु लागनात, पण येशु त्यासना हातमातीन निसटीन
निंघी गया.
40 ✡येशु परत यार्देन नदीना पलीकडे, योहान बाप्तिस्मा करे त्या ठिकाणवर गया
अनं तठे राहीना.
41 तवय त्यानाकडे बराचसा लोके वनात; त्या बोलनात, “योहाननी काही
चमत्कार करात नही खरं शे; पण योहाननी यानाबद्दल जे काही सांगेल व्हतं ते
सर्व खरं शे.”
42 तठे बराचसा लोकसनी त्यानावर ईश्वास ठेवा.

# 11

## मरेल लाजरसले जिवत करनं

1 ✡मरीया अनी तिनी बहिणी मार्था यासना बेथानी गावमधला लाजरस नावना
एक माणुस आजारी व्हता.
2 ✡जी मरीयानी प्रभुना पायले सुगंधी तेल लावं अनी त्या आपला केससघाई
पुसात; तिना हाऊ आजारी पडेल लाजरस भाऊ व्हता.
3 यामुये त्या बहिणीसनी येशुले सांगीन धाडं की; “प्रभुजी, ज्यानावर तुमनं प्रेम
शे तो आजारी शे.”

✡ **10:40** १०:४० योहान १:२८ ✡ **11:1** ११:१ लूक १०:३८,३९ ✡ **11:2** ११:२ योहान १२:३

4 हाई ऐकीन येशु बोलना, “हाऊ आजारना शेवट लाजरसनं मरण नही शे; तर
देवना गौरवकरता म्हणजे त्यानाद्वारे देवना पोर्‍यानं गौरव व्हवाले पाहिजे म्हणीन
शे.”
5 मार्था, तिनी बहिण अनी लाजरस यासनावर येशुनी प्रिती व्हती.
6 लाजरस आजारी शे हाई बातमी भेटनी तरी बी तो व्हता त्याच ठिकाणवर
आखो दोन दिन राहीना.
7 त्यानंतर त्यानी शिष्यसले सांगं, “आपण परत यहूदीयामा जावुत.”
8 शिष्य त्यासले बोलनात, “गुरजी, काही दिन पहिले यहूदी लोके तुमनावर
दगडमार कराले दखी राहींतात; तरी तुम्हीन परत तठे जावाना ईचार करी राहिनात
का?”
9 येशुनी त्यासले उत्तर दिधं, “दिनना बारा तास शेतस का नहीं? कोणी दिनमा
चालस तर त्याले ठेच लागस नहीं, कारण तो या जगना प्रकाश दखस.
10 पण कोणी रातमा चालस तर त्याले ठेच लागस, कारण त्यानाकडे प्रकाश
नही.”
11 ते बोलानंतर येशुनी त्यासले सांगं, “आपला मित्र लाजरस झोपेल शे, मी
त्याले झोपमाईन ऊठाडाले जास.”
12 यावरतीन शिष्य त्याले बोलनात, “प्रभुजी, जर तो झोपेल व्हई तर वाची
जाई.”
13 येशु लाजरसना मरणबद्दल अस बोलना व्हता, पण तो झोपबद्दल बोली राहीना
अस त्यासले वाटनं.
14 यामुये येशुनी त्यासले उघड सांगं, “लाजरस मरेल शे,
15 अनी मी तठे नव्हतु म्हणीन तुमनामुये माले आनंद वाटस, यानाकरता की
तुम्हीन ईश्वास ठेवाले पाहिजे, चला आपण त्यानाकडे जावुत.”
16 यामुये ज्याले दिदूम म्हणेत तो थोमा आपला जोडीदारसले म्हणजे बाकीना
शिष्यसले बोलना, “आपण बी यानासंगे मराले जावानं!”

## पुनरूत्थान अनी जिवन येशु शे

17 जवय येशु वना तवय त्याले माहीत पडनं की लाजरसले चार दिन पहिलेच
कबरमा ठेयेल व्हतं.
18 बेथानी गाव यरूशलेमपाईन सुमारे सव्वातीन किलोमीटर वर व्हतं,
19 तठे मार्था अनी मरीया यासनाकडे त्यासना भाऊबद्दल सांत्वन कराकरता
यहूदीयामातील बराच लोके त्यासनाकडे येल व्हतात.
20 येशु ई राहीना हाई ऐकताच, मार्था त्याले भेटाले गयी, मरीया घरमाच राहीनी.

21 मार्था येशुले बोलनी, “प्रभुजी, तुम्हीन आठे राहतात तर मना भाऊ नही
मरता!
22 पण तरी आते बी तुम्हीन जे काही देवजोडे मांगशात ते देव तुमले दि, हाई
माले माहीत शे.”
23 येशुनी तिले सांगं, “तुना भाऊ परत जिवत व्हई.”
24 मार्था त्याले बोलनी, “तो शेवटला दिनले पुनरूत्थानना येळले परत जिवत
व्हई हाई माले माहीत शे.”
25 येशुनी तिले सांगं, “पुनरूत्थान अनी जिवन मीच शे; जो मनावर ईश्वास
ठेवस तो मरेल व्हई तरी जगी;
26 अनी जो जिवत शे अनं मनावर ईश्वास ठेवस तो कधीच मरावं नही; यावर
तु ईश्वास ठेवस का?”
27 ती त्याले बोलनी, “हो, प्रभुजी! जो जगमा येणारा देवना पोर्‍या ख्रिस्त तो
तुम्हीनच शेतस, असा ईश्वास मी धरेल शे.” अस बोलीन ती निंघी गई.

## येशु रडना

28 मंग मार्थानी तिनी बहिण मरीयाले बाजुले बलाईन सांगं, “गुरजी येल शेतस,
अनी त्या तुले बलाई राहीनात.”
29 हाई ऐकताच ती लगेच फटकामा ऊठीसन त्यानाकडे गई.
30 येशु अजुन गावमा येल नव्हता, मार्था त्याले भेटनी तठेच तो व्हता.
31 ज्या यहूदी लोके मरीयाजोडे घरमा बठेल व्हतात अनं तिनं सांत्वन करी
राहींतात त्यासनी तिले पटकन ऊठीसन बाहेर जातांना दखीन, ती कबरकडे रडाले
जाई राहीनी अस समजीन त्या तिनामांगे गयात.
32 येशु व्हता तठे मरीया येवावर त्याले दखीन ती त्याना पाया पडनी अनी त्याले
बोलनी, “प्रभुजी, तुम्हीन आठे राहतात, तर मना भाऊ नही मरता!”
33 येशुनी तिले अनी तिनासंगे येल यहूदी लोकसले रडतांना दखीसन त्यानं मनं
भलतच व्याकुळ व्हयनं अनं तो दुःखी व्हयना.
34 अनी बोलना, “तुम्हीन त्याले कोठे ठेल शे?” त्या त्याले बोलनात, “प्रभुजी,
ईसन दखा”
35 येशु रडना.
36 यावरतीन यहूदी लोके बोलनात, “दखा, यानं त्यानावर कितलं प्रेम व्हतं!”
37 पण त्यासनामातीन बराचजन बोलनात, “ज्यानी आंधयासना डोया उघडात
त्यानामा, ह्यानी मराले नको, अस करानी शक्ती नव्हती का?”

### लाजरले जिवत करामा येस

38 परत येशु मनमा व्याकुळ व्हईसन कबरकडे वना; ती एक गुहा व्हती, अनी
तिना तोंडवर धोंड ठेल व्हती.
39 येशुनी सांगं, "धोंड काढा!" त्या मरेल माणुसनी बहिण मार्था त्याले बोलनी,
"प्रभुजी, आते त्याले दुर्गंधी येत व्हई, कारण त्याले चार दिन व्हयेल शेतस!"
40 येशुनी तिले सांगं, "तु ईश्वास धरशी तर देवनं गौरव दखशी अस मी तुले
सांगेल नव्हतं का?"
41 यावरतीन त्यासनी धोंड काढी; तवय येशुनी नजर वर करीसन सांगं, "हे
पिता, तु मनं ऐकं म्हणीन मी तुना आभार मानस;
42 माले माहीत शे तु कायम मनं ऐकस, तरी बी जी लोकसनी गर्दी मना
आजुबाजू उभी शे त्यासनाकरता मी बोलनु, यानाकरता की तु माले धाडेल शे असा
त्यासनी ईश्वास कराले पाहिजे"
43 अस बोलीन त्यानी मोठा आवाजमा हाक मारीन बोलना, "लाजरस, बाहेर
ये!"
44 तवय तो मरेल माणुस बाहेर वना, त्याना हात पाय प्रेतवस्त्रसघाई बांधेल अनी
तोंड रूमालघाई गुंढाळेल व्हतं. येशुनी त्यासले सांगं, "याले मोकळ करा अनी
जाऊ द्या."

### येशुबद्दल कट

(मत्तय २६:१-५; मार्क १४:१,२; लूक २२:१,२)

45 मरीयाकडे ज्या लोके येल व्हतात त्यासनी दखं की येशुनी काय करं, अनी
त्यासनापैकी बराच जणसनी त्यानावर ईश्वास ठेवा.
46 पण बराच जणसनी परूशी लोकसकडे जाईन येशुनी काय करं ते त्यासले
सांगं.
47 यावरतीन मुख्य याजकसनी अनी परूशीसनी सभा भराईन सांगं, "आपण
काय करी राहीनुत? कारण तो माणुस बराच चमत्कार करस!
48 आपण त्याले असच सोडं तर सर्व लोके त्यानावर ईश्वास ठेवतीन अनी रोमी
अधिकारी ईसन आपलं मंदिर अनी आपला राष्ट्रना नाश करतीन!"
49 तवय त्यासनामा कैफा नावना कोणतरी माणुस त्या वरीसले मुख्य याजक
व्हता; तो त्यासले बोलना, "तुमले काहीच समजस नही!
50 तुम्हीन हाई बी ध्यानमा लेतस नही की, प्रजाकरता एक माणुसनी मरानं अनी
सर्वा राष्ट्रना नाश व्हवानं टळी जावं हाई तुमना हितनं शे."

51 हाई तो आपला मननं बोलना नही; पण त्या वरीस तो मुख्य याजक असतांना
भविष्यवाणी करी की, येशु आपला राष्ट्रकरता मरावं शे,
52 अनी फक्त राष्ट्रकरता नही, तर यानाकरता त्यानी देवना पांगाई जायेल
लोकसले जमाडीन एक करानं.
53 त्या दिनपाईन यहूदी अधिकारीसनी येशुले मारी टाकाना निश्चय करा.
54 यामुये येशु तवयपाईन यहूदी लोकसमा उघडपणे फिरना नही, तर तठेन
जंगलजोडेना प्रांतमाधला एफ्राईम नावना नगरमा गया, अनी तठे आपला शिष्यसंगे
राहीना.
55 तवय यहूदीसना वल्हांडण सण जोडे येल व्हता, अनी बराच लोके वल्हांडण
सणना पहिले धार्मीक प्रथानुसार स्वतःले शुध्द करी लेवाकरता बाहेरगावतीन
यरूशलेममले गयात.
56 त्यासनी येशुना शोध करा अनी मंदिरमा उभा असतांना एकमेकसले बोलनात,
“तुमले काय वाटतस? तो सणले येवाव नही का?”
57 मुख्य याजकसनी अनी परूशीसनी येशुले धराना हेतुतीन आदेश देयल व्हता
की, येशु कोठे शे हाई एखादाले समजनं त्यानी खबर देवानी.

# 12

## बेथानी गावले येशुना अभिषेक

*(मत्तय २६:६-१३; मार्क १४:३-९)*

1 मंग येशु वल्हांडणना पहिले सव दिन बेथानी गावले वना, ज्या लाजरसले
येशुनी मरेलसमाईन जिवत करेल व्हतं तो तठे व्हता.
2 तठे त्यानी त्यासनाकरता जेवण करं, तवय मार्था जेवण वाढी राहींती; अनी
लाजरस त्यासना पंगतमा बसेलसपैकी एक व्हता.
3 ✡तवय मरीयानी अर्ध लिटर शुध्द जटामांसीन मोलवान सुगंधी तेल लिसन
येशुना पायले लावं अनी आपला केससघाई त्याना पाय पुसात, तवय त्या सुगंधी
तेलना वासघाई ते घर भरी गयं.
4 येशुले धरी देणारा, त्याना शिष्यसमातील यहुदा इस्कर्योत नावना एकजण
बोलना,
5 “हाई सुगंधी तेल तिनशे चांदिना शिक्कासमा ईकीसन ते गरीबसले का बरं
दिधं नही?”

✡ **12:3** १२:३ लूक ७:३७,३८

6 त्याले गरीबसनी काळजी व्हती म्हणीन तो ते बोलना अस नही, तर तो चोर
व्हता; त्यानाकडे पैसासनी थैली राहे अनी तीमा जे काही टाकेत ते तो चोरी ले,
म्हणीन तो अस बोलना.
7 यावरतीन येशु बोलना, "मना उत्तरकार्यना दिनकरता ते तिले ठेवु द्या.
8 कारण गरीब तर कायमना तुमना जोडे शेतस, पण मी तुमना जोडे कायम राहसु
अस नही."

## लाजरसले मारी टाकाना कट

9 येशु तठे शे अस बराचसा यहूदी लोकसले समजनं अनी फक्त येशुकरता नही
तर ज्या लाजरसले त्यानी मरेल मातीन जिवत करं व्हतं त्याले बी दखाकरता त्या
वनात.
10 मुख्य याजकसनी लाजरसले बी मारी टाकाना निश्चय करा.
11 कारण त्यानामुये बराचसा यहूदी लोके त्यासले सोडीन येशुवर ईश्वास ठि
राहींतात.

## जयोत्सवतीन यरूशलेममा प्रवेश

*(मत्तय २१:१-११; मार्क ११:१-११; लूक १९:२८-४०)*

12 दुसरा दिन सणले येल मोठी लोकसनी गर्दी येशु यरूशलेमले ई राहीना हाई
ऐकीन.
13 खजुरन्या फांद्या लिसन त्यानी भेटकरता बाहेर निंघनात, अनी गजर करीसन
बोलनात, "होसान्ना! प्रभुना नावतीन येणारा! इस्राएलसना राजा धन्यवादित
असो!"
14 येशुले गधडानं धाकलं शिंगरू भेटावर तो त्यानावर बसना, हाई शास्त्रमा
लिखेलप्रमाणे घडनं ते अस,
15 "हे सियोननी कन्या! भिऊ नको,
दख तुना राजा,
गाढवना शिंगरूवर बठीन येस."
16 या गोष्टी त्याना शिष्यसले पहिले समजन्याच नहीत; येशुनं गौरवतीन ऊठना
तवय त्यासले याद वनं की, त्यानाबद्दल या गोष्टी लिखेल व्हत्यात तसच लोकसनी
त्यानासंगे करं.
17 त्यानी लाजरसले कबरमातीन बलाईन मरेल मातीन जिवत करं त्या येळले
जी लोकसनी गर्दी त्यानासंगे व्हती ती गर्दी त्यानाबद्दल साक्ष दि राहींती.
18 यावरतीन बी लोके त्याले भेटाले गयात, कारण त्यानी या चमत्कार करेल
शेतस, अस त्यासनी ऐकेल व्हतं.

19 यामुये परूशी लोके एकमेकसले बोलनात, “तुमनं काहीच चाली नही राहीनं
हाई ध्यानमा ल्या! दखा, सर्व जग त्यानामांगे चाली राहीनं!”

### ग्रीक लोकसनी येशुले ईनंती

20 सणमा उपासना कराले यरूशलेममा येल लोकसमा काही ग्रीक लोके व्हतात.
21 त्यासनी गालीलमातील बेथसैदा गावना फिलीप्प यानाजोडे ईसन ईनंती करी
की, “महाराज, आमनी येशुले भेटानी ईच्छा शे.”
22 फिलीप्पनी जाईन अंद्रियाले सांगं तवय त्यासनी ईसन येशुले सांगं.
23 येशुनी त्यासले उत्तर दिधं, “मनुष्यना पोऱ्याना गौरव होवानी येळ ई जायेल
शे.
24 मी तुमले खरं सांगस; गहुना दाणा जमीनमा पडीन मरना नही तर तो एकलाच
ऱ्हास; अनी तो मरना तर बरंच पिक देस.
25 ✡जो आपला जीववर प्रेम करस तो त्याले गमाडी; अनी जो या जगमा आपला
जिवना व्देष करस तो त्यानं सार्वकालिक जिवनकरता रक्षण करस.
26 जर कोणी मनी सेवा करस तर त्यानी मनामांगे येवानं, म्हणजे जठे मी शे तठे
मना सेवक बी राही; कोणी मनी सेवा करी तर पिता त्याना सन्मान करी.”

### येशु स्वतःना मरनबद्दल बोलस

27 “आते मना जीव व्याकुळ व्हई राहीना; आते मी काय बोलु? हे पिता, हाई
येळपाईन मनं रक्षण कर; तरी बी मी या येळकरताच येल शे.
28 हे पिता, तु तुना नावना गौरव कर!” तवय अशी आकाशवाणी व्हयनी की,
“मी तो गौरव करेल शे, अनी परत बी गौरवसु.”
29 तवय ज्या लोके उभा व्हतात त्या आवाज ऐकीसन बोलनात, ढगसमातीन
गर्जना व्हयनी, बाकीना बोलनात, “त्यानासंगे देवदूत बोलनात.”
30 पण येशु त्यासले बोलना, “हाई वाणी मनाकरता नही तर तुमनाकरता व्हयनी,
31 आते या जगना न्याय येळ शे, आते या जगना आधिकारीसले बाहेर टाकाई
जाई
32 माले पृथ्वीपाईन उच्च कर तर मी मनाकडे सर्वासले ओढी लिसु.”
33 आपण कोणता मरणघाई मराव शेतस हाई सुचाडाकरता तो अस बोलना.

✡ **12:25** १२:२५ मत्तय १०:३९; १६:२५; मार्क ८:३५; लूक ९:२४; १७:३३

34 यावरतीन लोके त्याले बोलनात, ख्रिस्त सर्वकाळ ऱ्हावाव शे, अस आम्हीन
नियमशास्त्रमा ऐकेल शे; तर मनुष्यना पोऱ्याले उच्च कराले पाहिजे अस तुम्हीन
कसं काय म्हणतस? हाऊ मनुष्यना पोऱ्या शे तरी कोण?
35 यावरतीन येशुनी त्यासले उत्तर दिधं, "आखो थोडा येळ तुमनामा प्रकाश शे,
तुमले अंधारनी गाठाले नको म्हणीसन तुमनाकडे प्रकाश शे तोपावत चाला, कारण
जो अंधारमा चालस त्याले आपण कोठे जाई राहीनु हाई समजत नही.
36 तुम्हीन प्रकाशना पोऱ्या व्हवाले पाहिजे म्हणीसन उजेड शे तोपावत प्रकाशवर
ईश्वास ठेवा."
येशु हाई सर्व बोलीसन निंघी गया अनी त्यासनापाईन गुप्त राहीना.

## लोकसना अईश्वास

37 त्यानी त्यांसनासमोर इतला चिन्ह करात तरी त्यासनी त्यानावर ईश्वास ठेवा
नही.
38 यानाकरता की यशया संदेष्टानी जी गोष्ट सांगेल व्हती ती पुरी व्हवाले पाहिजे
ती अशी की; "प्रभु, आम्हीन करेल प्रचारवर कोणी ईश्वास ठेयल शे? परमेश्वरनी
शक्ती कोणले प्रकट व्हयेल शे?"
39 यामुये त्यासनाघाई ईश्वास ठेवाई नही राहींता, यशया आखो बोलना;
40 "कधीच अस व्हवाले नको की, त्यासनी डोयासघाई दखु नही, मनपाईन
त्यासले समजाले नको, त्यासनी मनाकडे फिराले नको, म्हणीसन त्यानी त्यासना
डोया आंधया करेल शे अनं त्यासनं मन कठीण करेल शे."
41 यशयानी हाई यानाकरता बोलना की, त्यानी येशुनं गौरव दखं अनी
त्यानाबद्दल बोलना.
42 अस व्हतं तरी बी यहूदी अधिकारीसमातीन बराच जणसनी त्यानावर
ईश्वास ठेवा, पण आपले सभास्थानमातीन काढी टाकाले नको म्हणीसन परूशी
लोकससमोर त्यासनी हाई कबुल करं नही.
43 कारण त्यासले देवकडला गौरवपेक्षा माणुसकडलं गौरव जास्त आवडनं.

## येशु जगना प्रकाश

44 येशु मोठ्ठा आवाजमा बोलना, "जो मनावर ईश्वास ठेवस तो मनावर ईश्वास
ठेवस नही, तर ज्यानी माले धाडेल शे त्यानावर ठेवस.
45 अनी जो माले दखस, तो ज्यानी माले धाडेल शे त्याले दखस.

46 मी जगमा प्रकाश म्हणीसन येल शे, यानाकरता की मनावर ईश्वास ठेवणारा
कोणी बी अंधारामा ऱ्हावाले नको.
47 मना वचनं ऐकीसन जो पाळस नही तर त्याना न्याय मी करस नही, कारण
मी जगना न्याय कराकरता नही तर, जगनं उध्दार कराकरता येल शे.
48 जो मना अनी मना वचनसना स्विकार करस नही त्याना न्याय करनारा
एकजण शे, जे वचन मी सांगेल शे तेच शेवटला दिनले त्याना न्याय करी.
49 कारण मी मना मननं बोलनु नही, तर मी काय सांगानं अनं काय बोलानं
याबद्दल ज्या पितानी माले धाडेल शे, त्यानीच माले आज्ञा देयल शे.
50 त्यानी आज्ञा सार्वकालिक जिवन जोडे ली जास शे हाई माले माहीत शे,
यामुये मी जे बी बोलस ते पितानी सांगेलप्रमाणेच बोलस.''

# 13

## येशु शिष्यसना पाय धुवस

1 वल्हांडण सणना पहिले, या जगमाईन पिताकडे जावानी आपली येळ येल शे
हाई येशुनी समजी लिधं, अनी या जगमातील आपलासवर त्यानं प्रेम व्हतं ते त्यानी
शेवटपावत करं.
2 येशु अनी त्याना शिष्य संध्याकायनं जेवण करी राहिंता तवय शिमोनना पोऱ्या
यहुदा इस्कर्योत याना मनमा त्याले धरी देवानं अस सैताननी पहिलेच घाली देयल
व्हतं
3 तवय आपला हातमा पितानी सर्वकाही देयल शे, आपण देवकडतीन वनु अनी
देवकडे जाई राहीनु,
4 हाई वळखीसन जेवण करतांना येशु जेवणवरतीन ऊठना, त्यानी आपला कपडा
काढी ठेवात अनी रूमाल लिसन कंबरले गुंडाळी लिधा.
5 मंग तो एक भांडामा पाणी लिसन शिष्यसना पाय धवु लागना, अनी कंबरले
गुंडाळेल रूमालघाई ते पुसू लागना.
6 तो शिमोन पेत्रकडे वना, तवय तो त्याले बोलना, ''प्रभुजी, तुम्हीन मना पाय
धुतस का?''
7 येशुनी उत्तर दिधं, ''मी करस ते तुले आत्ते कळाव नही, ते पुढे कळी.''
8 पेत्र त्याले बोलना, ''तुम्हीन कधीच मना पाय धुवाले नको!'' येशुनी त्याले
उत्तर दिधं, ''मी तुना पाय जर नही धुवात तर मनासंगे तुले वाटा नही.''
9 शिमोन पेत्र त्याले बोलना, ''प्रभुजी, मना फक्त पायच धुवू नका, तर हात अनी
डोकं बी धुवा.''

10 येशुनी त्याले सांगं, "ज्यानं आंग धोवायेल शे त्याले पायशिवाय काहीच
धुवानी गरज नही, तो पुरा शुध्द शे, अनी तुम्हीन शुध्द शेतस, तरी सर्वाजन नही."
11 कारण आपले धरी देणार माणुस त्याले माहीत व्हता, यावरतीन तो बोलना,
"तुम्हीन सर्वाच शुध्द नही."

12 ✡मंग त्यासना पाय धुवानंतर, आपला कपडा घालीसन येशु बसना अनी
त्यानी त्यासले सांगं, "मी तुमले काय करं हाई तुमले समजनं का?
13 तुम्हीन माले गुरू अनं प्रभु अस म्हणतस, ते बराबर म्हणतस, कारण मी तसाच
शे.
14 यामुये जो मी तुमना प्रभु अनं गुरू, तुमना पाय धुवात तर तुम्हीन एकमेकसना
पाय धुवालेच पाहिजे.
15 हाऊ मी तुमले एक कित्ता घाली देयल शे, जसं मी तुमले करं तसं तुम्हीन
कराले पाहिजे.
16 ✡मी तुमले खरंखरं सांगस दास आपला धनीपेक्षा थोर नही, अनी जो धाडेल
तो धाडणारापेक्षा थोर नही.
17 या गोष्टी तुमले माहीत शेतस अनी जर त्यानामायक तुम्हीन चालशात, तर
तुम्हीन धन्य शेतस.
18 मी तुमना सर्वासबद्दल बोली नही राहीनु, ज्या मी निवाडेल शे त्या माले माहीत
शे तरी 'जो मनी भाकर खास त्यानी मनावर आपली टाच उचलेल शे' असा जो
शास्त्रलेख शे तो पुरा व्हयेल शे.
19 हाई मी तुमले आते म्हणजे हाई व्हवाना पहिले सांगस, यानाकरता की जवय
हाई व्हई तवय तुम्हीन ईश्वास धराले पाहिजे की 'मी तो शे.'
20 ✡मी तुमले खरंखरं सांगस की मी धाडस त्याना जो स्विकार करस तो मना
स्विकार करस, अनी जो माले स्विकारस, तो ज्यानी माले धाडं, त्याले स्विकारस."

### आपला ईश्वासघात करनाराले येशु दखाडस
### *(मत्तय २६:२०-२५; मार्क १४:१७-२१; लूक २२:२१-२३)*

21 अस बोलानंतर येशु आत्मातीन व्याकुळ व्हयना अनं बोलना, "मी तुमले
खरंखरं सांगस, तुमनामधला एकजण माले धरी देवाव शे."

22 तो कोणबद्दल बोली राहीना हाई शंकातीन शिष्य एकमेकसकडे दखु लागनात.

✡ **13:12** १३:१२ लूक २२:२७ ✡ **13:16** १३:१६ मत्तय १०:२४; लूक ६:४०; योहान १५:२०
✡ **13:20** १३:२० मत्तय १०:४०; मार्क ९:३७; लूक ९:४८; १०:१६

23 तवय ज्यानावर येशुनी प्रिती व्हती असा त्याना शिष्यसमाधला एकजण येशुना
जोडेच बठेल व्हता.
24 तो शिमोन पेत्र इशारा करीसन बोलना, “तो ज्यानाबद्दल बोली राहिना तो
कोण शे हाई आमले सांग.”
25 तवय तो तसाच येशुना जोडे असतांना मांगे फिरीन त्याले बोलना, “प्रभुजी
तो कोण शे?”
26 येशुनी उत्तर दिधं, “ज्याले मी घास बुचकाळीसन दिसु तोच तो शे.” मंग
त्यानी घास बुचकाळीसन शिमोन इस्कर्योतना पोऱ्या यहुदा इस्कर्योत याले दिधा.
27 मंग घास देवावर सैतान त्यानामा घुसना, मंग येशुनी त्याले सांगं, “जे तु कराव
शे ते लवकर कर!”
28 त्यानी त्याले अस का बरं सांग हाई जेवणले बठेलसपैकी कोणलेच समजनं
नही.
29 यहुदाजोडे पैसाना थैली व्हती, यामुये सणकरता आपले काही लेनं व्हई ते
ईकत लेवाकरता किंवा गरीबसले काही देनं व्हई म्हणीसन येशुनी त्याले सांग व्हई,
अस बराच जणसले वाटनं.
30 मंग घास लेताच तो लगेच बाहेर गया, तवय रातनी येळ व्हती.

## नवी आज्ञा

31 तो बाहेर जावानंतर येशुनी सांगं, आते मनुष्यना पोऱ्यानं गौरव व्हयेल शे अनी
त्यानामा देवनं गौरव व्हयेल शे.
32 जर देवनं गौरव त्यानाकडतीन प्रकट व्हयेल शे, तर देव बी आपलाकडतीन
त्यानं गौरव प्रकट करी अनी लवकर करी.
33 ✡अहो पोऱ्यासवन, मी आखो थोडा येळ तुमनासंगे शे, तुम्हीन मना शोध
करशात अनी जसं मी यहूदी अधिकारीसले सांगं की, जठे मी जासु तठे तुमनाघाई
येवावनार नही, तसच मी तुमले बी सांगस,
34 ✡अनी मी तुमले नवी आज्ञा देस की; तुम्हीन एकमेकसवर प्रिती करानी,
जशी मी तुमनावर प्रिती करी तशी तुम्हीन एकमेकसवर प्रिती करानी.
35 तुमनी एकमेकसवर प्रिती राहीनी म्हणजे त्यावरतीन सर्व वळखतीन की,
तुम्हीन मना शिष्य शेतस.

✡ **13:33** १३:३३ योहान ७:३४ ✡ **13:34** १३:३४ योहान १५:१२,१७; १ योहान ३:२३; २ योहान १:५

### पेत्र माले नकारी हाई येशु पहिलेच सांगस
### (मत्तय २६:३१-३५; मार्क १४:२७-३१; लूक २२:३१-३४)

36 शिमोन पेत्र त्याले बोलना, “प्रभुजी, तुम्हीन कोठे जाई राहीनात?” येशुनी
उत्तर दिधं, “जठे मी जास तठे आते तुनाघाई मनामांगे येवावनार नही; तरी यानानंतर
येशी.”
37 पेत्र त्याले बोलना, “प्रभुजी, मनाघाई तुमना मांगे आत्तेच का बरं येवावनार
नही? मी तुमनाकरता मना जीव दिसु!”
38 येशुनी त्याले उत्तर दिधं, “काय, मनाकरता तु तुना जीव देशी? मी तुले
खरंखरं सांगस, तु माले तीनदाव नकारस नही तोपावत कोंबडा कोकावणार नही.”

# 14

### पिताकडे जावानी वाट

1 येशुनी त्यासले सांग, “तुम्हीन मनमा नाराज व्हवु नका; देववर ईश्वास ठेवा
अनी मनावर बी ईश्वास ठेवा.
2 मना बापना घरमा राहवाले भरपूर जागा शे, नही राहत्यात तर मी तुमले सांगतु,
मी तुमनाकरता जाग तयार कराले जाई राहीनु.
3 अनी मी जाईसन तुमनाकरता जाग तयार करी म्हणजे परत ईसन तुमले
आपलाजोडे लिसु, यानाकरता की जठे मी शे तठे तुम्हीन बी ऱ्हावाले पाहिजे.
4 मी जास तिकडली वाट तुमले माहीत शे.”
5 थोमा त्याले बोलना, “प्रभु, तुम्हीन कोठे जातस हाई आमले माहीत नही, मंग
तठे येवाकरता आमले वाट कशी माहीत राही?”
6 येशुनी त्याले सांगं, “मार्ग, सत्य अनी जिवन मीच शे; मनाजोडे येवाशिवाय
पिताकडे कोणीच जास नही.
7 मी कोण शे हाई जर तुम्हीन वळखतात तर मना पिताले बी वळखतात; आठेन
पुढे तुम्हीन त्याले वळखतस अनं तुम्हीन त्याले दखेल बी शे.”
8 फिलीप्प त्याले बोलना, “प्रभु, पिता आमले दखाडा म्हणजे आमले भरपूर
शे.”
9 येशुनी त्याले सांगं, “फिलीप्प, मी इतका काळ तुमनासंगे व्हतु तरी तु माले
वळखतस नही का? ज्यानी माले दखं त्यानी पिताले दखं शे; तर ‘पिता आमले
दखाडा,’ हाई तु कसं म्हणस?

10 मी पितामा अनी पिता मनामा शे असा ईश्वास तु धरस नही का? ज्या गोष्टी मी
तुमले सांगस त्या मी आपला मनन्या सांगस नही तर मनामा राहनारा पिता स्वतःना
कामे करस.
11 मी पितामा अनी पिता मनामा ऱ्हास हाई मना शब्द खरा माना, नहीतर मना
काममुये तरी मनं खरं माना.
12 मी तुमले खरंखरं सांगस, मी ज्या कृत्ये करस त्या मनावर ईश्वास ठेवनारा
बी करी, अनी त्यानापेक्षा मोठा करी, कारण मी पिताकडे जास.
13 तुम्हीन जे काही मना नावतीन मांगशात ते मी करसु, यानाकरता की पोऱ्यामा
पितानं गौरव व्हवाले पाहिजे.
14 तुम्हीन मना नावतीन मनाकडे काही बी मांगशात तर ते मी करसु."

## पवित्र आत्मा मिळाबद्दल वचन

15 मनावर तुमनी प्रिती व्हई तर मन्या आज्ञा पाळशात.
16 मी पिताले ईनंती करसु, मंग तो तुमले दुसरा कैवारी दि; त्यानी तुमनासंगे
सदासर्वदा ऱ्हावाले पाहिजे म्हणीसन.
17 जो सत्यना आत्मा तो देवना सत्यले प्रकट करस, त्याले जगना लोकसघाई
लेवावनार नही, तुम्हीन त्याले दखशात, तुम्हीन त्याले वळखशात, कारण तो
तुमनामा ऱ्हास अनी तुमनामा वस्ती करीसन राही.
18 मी तुमले अनाथ असा सोडावं नही, तुमनाकडे परत ईसु.
19 आखो थोडाच येळ शे मंग जग माले आखो दखाव नही, तरी तुम्हीन
